# Paul Brunton

One of the greatest spiritual explorers of the twentieth century

# A Search In Secret India

The classic work on seeking a guru

'Excellent...'
*The Times*



# गूढ भारताचा शोध

अनुवाद : मधुकर सोनावणे

# गूढ भारताचा शोध

## ( A Search in Secret INDIA)

मूळ लेखक : पॉल ब्रन्टन

अनुवाद : मधुकर सोनावणे

ई साहित्य प्रतिष्ठान

गूढ भारताचा शोध

मूळ लेखक : पॉल ब्रन्टन

मराठी अनुवाद : मधुकर सोनावणे

msonavane@hotmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www. esahity. com**

**esahity@gmail. com**

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : २० जानेवारी २०१६

# प्रकाशकाचे दोन शब्द

२०१६ हे वर्ष ई साहित्यासाठी फ़ारच उत्साहाने सुरू होत आहे. या वर्षाची सुरुवातच मुळी लिओ टॉलस्टॉय, पॉल ब्रन्टन, आणि मनुस्मृतीने होत आहे. धर्माकडे पहाण्याचे तीन विविध दृष्टीकोन यांत आहेत. २०१५ मध्ये ई साहित्य मधून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत बहिणावाई, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, गीतारहस्य, भगवद्गीता, अशा अनेक मौल्यवान ग्रंथांची ई निर्मिती करण्याचा योग आला. २०१६ ची सुरुवात बायबल, मनुस्मृती पासून झाली आणि त्यात कुराण, बौद्धमत, जैनधर्म, ज्यू, पारशी, वेद, उपनिषदे अशा विविध धर्मशास्त्रांची भर पडावी असा योग दिसतो आहे. योग दिसतो असे यासाठी म्हणतो की ही पुस्तके गेल्यावर्षीही आम्ही कुठे मुद्दाम शोधायला गेलो नव्हतो. श्री विजय पांढरे, डॉ. श्री अशोक धांडे, श्री अविनाश नगरकर, श्री अरुण फ़डके, श्री रत्नाकर महाजन, श्री फ्रान्सिस आल्मेडा, श्री मधुकर सोनावणे, श्री अशोक कोठारे, श्री अरुण काकतकर या व इतर अनेक विद्वानांनी हे साहित्य मोठ्या विश्वासाने आमच्या हाती सोपवलं. आणि आम्ही फ़क्त पोस्टमनगिरी केली. आमच्या सुदैवाने प्रचंड मोठ्या वाचकवर्गाने या साहित्याचा आस्वाद घेतला. या महानुभावांच्या श्रमाचे काही प्रमाणात चीज झाले.

ई साहित्य प्रतिष्ठान निर्माण झाले नवीन साहित्यिकांसाठी एक व्यासपीठ म्हणून. ते तसेच आहे. आणि तसेच राहील. साधारण ८० टक्के पुस्तकं ही नवसाहित्यिकांचीच असतील. पण सुमारे वीस टक्के पुस्तकं नावाजलेली, वाचकप्रियही असावीत. म्हणजे वाचकांचा ओघ वाढता आणि वाहता रहातो.

मराठीतल्या महान प्रकाशकांच्या तुलनेत ई साहित्य अगदीच नगण्य आहे. आणि त्यांच्याशी तुलना वा स्पर्धा करण्याचा मानसही नाही. परंतू दर्जाच्या बाबतीत मात्र आम्ही तोडीस तोड राहू. हे वर्ष अत्यंत दर्जेदार कथा, कादंबऱ्या आणि काव्य-विनोद-शास्त्र पुस्तकांचे असेल याची आम्ही ग्वाही देतो.

आपण या साहित्य यज्ञात यथाशक्ती इंधन पुरवावे ही विनंती. आपल्या ओळखीच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला आमचे VIP सभासद करू. याशिवाय या कामात इतर अनेक तऱ्हांनी आपण सहभागी होऊ शकता. वेबसाईटला भेट तर देतच रहा. खंबीरपणे पाठीशी उभे रहा. मग बघाच काय काय चमत्कार घडतील ते.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य




# गूढ भारताचा शोध {पॉल ब्रन्टनच्या पुस्तकाचा संक्षिप्त अनुवाद}

अध्यात्माचा मार्गदर्शक ग्रंथ

ज्ञानेश्वर माऊलीच्या कृपेने या पुस्तकाची उपलब्धी झाली.

**अनुवाद - मधुकर वि. सोनवणे.नाशिक पंचवटी.**
**05/05/2015**

# गूढ भारताचा शोध {पॉल ब्रन्टनच्या पुस्तकाचा संक्षिप्त अनुवाद}



लेखकाविषयी- पॉल ब्रन्टन लंडन मध्ये १८९८ मध्ये जन्माला आला. २७ जुलाई १९८१ ला स्वित्झर्लंड मध्ये मरण पावला." गुह्य भारताचा शोध ' हे त्याचे गाजलेले पुस्तक १९३४ मध्ये प्रसिद्ध झाले. ती त्याच्या अध्यात्मिक प्रवासाची कथा आहे. पश्चिमेला योग आणि अध्यात्म याची ओळख करून देणारा म्हणून ब्रन्टन हा पहिला युरोपियन म्हणून ओळखला जातो. वेगळ्याच कारणासाठी शोध घेणारा हा योगभ्रष्ट पुरुष पुढे गुरूच्या प्राप्तीने कसा उन्नत होतो, हे अध्यात्ममार्गीच्या वाचकांना उद्बोधक ठरेल. या पुस्तकातील निवडक भाग अनुवादित केला आहे

**मूळ पुस्तकाविषयी लेखकाचे [पॉल ब्रन्टन] मनोगत**

*हे पुस्तक १९३४ मध्ये प्रकाशित झाल्यानंतर भारत फार बदलला आहे. आनंद मयी मां सारख्या सिद्ध योगिनीचा सत्संग पंडित नेहरूंना लाभला. बदलल्या स्थितीतही माझ्या लेखनातील अध्यात्म मुल्ये अबाधित राहिलीत. माझी भेट झालेले अनेक महर्षी व सत्पुरुष आता या जगात नाहीत. पण त्यांच्या सत्संगाने मला झालेला लाभ मी विसरू शकत नाही. विशेषतः अरुणाचलाचे महर्षी रमण.*
*हिमालयाच्या पायथ्याशी अध्यात्म क्षेत्रातील तिबेटचे नामवंत दलाई लामा, शांती आणि बुद्ध तत्वज्ञानद्वारा जगाला उन्नत करण्याचा यत्न करीत आहेत. गेल्या २०-३० वर्षात पश्चीमेतील अनेक व्यक्ती अद्यात्म क्षेत्रात उन्नत झालेल्या आहेत.*

माझे मनोगत

हे पुस्तक १९७५ मध्ये चाळीसगावला प्रथम वाचनांत आले. रमण महर्षीच्या बद्दल त्यावेळी विशेष माहिती नव्हती, रेल्वे क्वार्टरचे मागे जगप्रसिद्ध पारसी कलाकार के. की. मूस यांचा बंगला होता. त्या एकांतवास स्विकारणाऱ्या ऋषी तुल्य व्यक्तीशी छान परिचय झाला होता. त्यांच्याकडे रमण महर्षींचे मोठे पोर्ट्रेट होते. मूस त्या चित्रातून व्यक्त होणारे महर्षींचे भाव आणि कोणत्याही जागी उभे राहून पाहिल्यावर महर्षींची आपल्यावर पडणारी दृष्टी मन खिळवून टाकी.

आपल्यालाही अध्यात्म मार्गी आणि भोंदू यातील फरक स्पष्टपणे समजणे आवश्यक असते. जीवनांत भोंदू गुरु लाभला, तर बहुमोल आयुष्य वाया जाते. पॉल ब्रन्टनला ज्या शंकराचार्यांनी रमण महर्षीच्या कडे जाण्यास उद्युक्त केले, ते परमाचार्य महागांव येथे आले असतांना, त्यांना भेटण्यास स्पेनची राणी तीन दिवस गुलबर्गा येथे रेल्वेची तीन कॅरेज घेऊन आली होती. त्या राणीचे तत्वज्ञानाचे शिक्षक गुलबर्गा येथे भेटले असता, शंकराचार्य यांची महती कळली व त्यांच्या दर्शनाचाही सुयोग १९८२ मध्ये आला होता.

काळाच्या ओघात रमण महर्षी आणि पॉल ब्रन्टन यांचे अध्यात्मिक नाते चांगलेच समजले.
कांही अन्य शोध घेत असतांना पॉल ब्रन्टनचे इन सर्च ऑफ सिक्रेट इंडिया हे पुस्तक नेट वर सांपडले. त्याचे वाचन करतांना त्यातील अध्यात्मिक मार्गदर्शन कुणाही वाचकाला उपयुक्त वाटेल, या उद्देशाने संक्षिप्तिकरण करण्याचे कार्य सुरु झाले. तिनेक महिन्यात हे कां पूर्ण झाले. या पुस्तकाने केलेले बहुमोल मार्गदर्शन इतरांनाही व्हावे या हेतूने ते मेलद्वारा मित्र परिवारात व अध्यात्म मार्गाची आवड असणारांकडे पाठवित आहे. संकलन व भाषांतर बुद्ध पौर्णिमेला पूर्ण झाले. व अंतिम हात फिरवून अंतर्गत अभिसरणा करिता पाठवीत आहे.

## पाठ १.-**वाचकांना नमस्कार**

भारत प्राचीन काळापासून अध्यात्मात अग्रेसर राहिला आहे. त्यातील अनेक सिद्ध पुरुष एकांतवासामुळे प्रकाशात आलेले नाहीत. भारत, चीन आणि तिबेट यांत असे अनेक सिद्ध पुरुष दडलेले आहेत. एकतर त्यांची ओळख समजणे दुरापास्त आणि नंतर त्यांच्याशी सत्संग होणे कठीण.

योग आणि अध्यात्मातील अनेकविध साधना सत्संगाशिवाय उमगत नाहीत. तीच गोष्ट अध्यात्मिक साहित्याबद्दल. त्यांचे अध्ययन फार काळजीपूर्वक करावे लागते.

भारतात सर्वच ज्ञानी व्यक्ती अध्यात्म मार्गी आहेत असे नव्हे. कारण असे अनेक ब्राह्मण पंडित भेटले, जे मुंडण करून देवाची सेवा होते, अशी स्वतःची अध्यात्म मार्गी म्हणून भलावण करून घेतात.

इतर अनेकांपैकी मीही असा एक होतो की, ज्यांना देवाच्या निवासाची भव्य उभारणी करून येथेच देव आहे, असे सांगणारे देवाच्या निवासाचे इस्टेट एजंटच देवाचे दर्शन करवून देतात, यावर विश्वास ठेवत होतो. फार काळजी पूर्वक खरे अध्यात्म मार्गी शोधावे लागतात.

भौतिकतेच्या मागे लागून, वास्तव अध्यात्माकडे दुर्लक्ष करणारे आणि बहुमुल्य जीवनाचा मौल्यवान काळ वाया घालविणारेच जास्त प्रसिद्ध आहेत, याचे मला वाईट वाटते. चमत्कारावर माझा विश्वास नाही. आपण निसर्गाला अजून पुरते समजून घेतलेले नाही, हा त्याचा अर्थ आहे.

## पाठ २. **शोध घेण्याची स्फूर्ती**

भुगोलाचे शिक्षक नकाशा दाखवित छडी नेत म्हणाले, हा भारत. जो ब्रिटीश अंमलामधील तेजस्वी शिरपेच आहे. ते ऐकणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या डोळ्यासमोर गुढतेचे वलय असलेला भारत उभा राहीला. त्याचे शाळेतील तास कोणताही असो, फेटे घातलेले, सावळ्या वर्णाचे चेहरे, मसाल्याच्या बोटी भरण्याची चित्रे चितारणे चालूच असायचे.
शाळा कॉलेजचे शिक्षण संपले. मात्र हिंदुस्थान आणि आशियाचे आकर्षण वाढतच गेले. वेगवेगळे नकाशे जमा झाले. त्यात रंग भरले गेले. एकादी आगबोट आपल्याला भारताकडे घेऊन जातेय, अशी दिवास्वप्ने सुरु झाली. अध्यात्माची भूमी भारत; बोलावित आहे, असे वाटू लागले.

दिनदर्शिकेची पाने उलटत गेली आणि एक दिवस आम्ही अशीच अध्यात्माची पुस्तके दुकानात पाहून, चर्चा करीत असतांना आलेला, एक सावळ्या वर्णाचा फेटेवाला हिंदुस्थानी भेटला. तो सरळ आमचे कडे आला आणि आमच्या संभाषणात घुसला. तुम्ही ज्या पुनर्जन्माच्या गोष्टी बोलत आहात, त्याची जगाला ओळख कुणी करून दिली? त्यासाठी तुम्हाला भारतात जावे लागेल. त्याच्या डोळ्यात चमक होती. बोलण्यात आत्मविश्वास होता.
तो बोलतच होता. पहा पायथागोरस भारतात आला, तेथे ब्राह्मणांशी चर्चा केल्यावर त्याच्या ज्ञानाला पालवी फुटली. जडातून बाहेर पाहायचं असेल तर भारतातच जायला पाहिजे. त्याचे शब्द अंतरातून उफाळून येत होते. चेहऱ्यावरचे भाव तेजस्वी होते.
“ आमच्या ऋषी मुनींनी हजारो वर्षापूर्वी, भविष्यात डोकावून आधीच त्या प्रश्नांविषयी मार्गदर्शन केले, ज्यावेळी पश्चिमेत तशा प्रश्नांचा पुसटसा विचारही नव्हता.”

ते ऐकून आमचा पुस्तक विक्रेताही एकदम शांत झाला. तो अज्ञात दरवाजा पर्यंत गेला आणि परत फिरून माझेकडे आला. त्याने त्याचे व्हिजिटिंग कार्ड मला दिले. मला म्हणाला, जमेल तेंव्हा आपण एकत्र रात्रीचे जेवण घेऊया. तुमच्याशी बोलायला आवडेल.

मी एका सायंकाळी त्या अनाहुताचे घर शोधून काढले. धुके होते. पण वातावरण छान होते. लोखंडी स्टँडवर प्रवेशाशी दोन मोठे दिवे तेवत होते. घरात प्रसन्नता जाणवत होती. दिवाणखाना भारतीय आणि चिनी पद्धतीच्या चित्रांनी सजला होता. जमिनीवर छानदार जाजम आंथरलेला होता. शेकोटी खाली जमिनीवर भल्या मोठ्या वाघाचे कातडे त्याच्या वटारल्या डोळ्यांच्या चेहऱ्यासहित शोभत होते. वरल्या बाजूला बहुदा बुद्धाची तसबीर होती. शांत. समाधानी अर्धोन्मिलीत नासिकाग्रावर स्थिरावलेले डोळे. प्रसन्न चेहरा.

माझ्या यजमानाने माझे आदर व आपुलकीने स्वागत केले. कांही वेळाने आम्ही जेवायला बसलो. आम्ही विशिष्ट विषयावर न बोलता अवांतर गपा केल्या. जेवण स्वादिष्ट होते. मात्र एक जाणवले, माझा यजमान ज्या विषयावर बोले, त्यात ठामपणा असे. जणु विषयावरील अंतिम विचार त्याचेच.

जेवण झाले आणि त्याने पुस्तकाच्या दुकानातील विषयाला हात घातला. तो म्हणाला, आमच्या ऋषी मुनींनी जे सांगितलं, त्याचा अर्थ पश्चिमेला नीट लावता आलेला नाही. कित्येकदा विपरीत अर्थ लावला आहे. पण मी कोण टीका करणारा ? आजचा भारत कुठे पोचलाय ? मोठेपणा फक्त भूतकाळाचे कौतुक करण्यापुरता उरला. ही खेदाची गोष्ट आहे. नको त्या चालीरीती आणि दांभिकता यांनी अध्यात्माचे नांव धारण केलेय.

मी विचारलं, असे कां घडले. त्यावर काही वेळ शांत बसून त्याने डोळे अर्धे मिटले, जणु तो आंतल्या जगात होता. तो म्हणाला, एके काळी जीवनाची गहन रहस्ये खोलवर शोधली जायची. अगदी राजे, महाराजे सुद्धा अशा महात्म्यांपुढे आदेशासाठी नतमस्तक असतं. हळूहळू अशा महंत, साधू यांनी समाजातून काढते अंग घेतले. आणि आमची अध्यात्मिक घसरण सुरु झाली. तो अगदी हळू बोलत शांतवला.

जरा वेळाच्या मौनानंतर तो म्हणाला, नाही म्हणायला, आजही त्या भूमीत मुठभर दिव्य व्यक्ती आहेत. सुदैवाने अशा एका थोर महात्म्याच्या सहवासाचा मला लाभ झाला. ते म्हणजे जणु माझे पिता, मार्गदर्शक, गुरु किंवा सन्मित्र होते.

त्यांच्या सहवासात वातावरण प्रसन्न आणि उदात्त असे. त्यांनी मला माणसातले दैवी अस्तित्व कसे पाहावे, ते शिकवले. सद्गुणांच्या सौंदर्याची दृष्टी दिली. ते वस्तीपासून दूर जंगलात एका कुटीत रहात. मला शक्य असायचे, तेवढे मी त्याच्या सहवासाचा लाभ घेई. त्यांनी मला मौल्यवान शिक्षण दिले. अशी माणसे म्हणजे त्या भूमीचे वैभव असते.

मग ते समाजांत कां राहले नाहीत? या माझ्या प्रश्नावर यजमान म्हणाले, त्यांच्या मनातले कोण जाणणार ? पण त्यांना अंतर राखूनही संपर्क परो मनो विज्ञानाने साधता येणे शक्य असल्याने तसे असावे.

त्या भेटीनंतर मी त्यांचेकडे जात राहिलो. त्याने सांगितले, ऋषिकेशपासून पुढे हिमालयात अशा योग्यांची जास्त वस्ती आहे. त्यांचे रहाणे साधे. गुहात अगर लहानशा कुटीत. जेवण अगदी थोडे; जीवन निर्वाहापुरते.

नित्य ईश्वर प्रार्थना अगर ध्यानात मग्न असतात. त्यांचा पवित्र पुस्तकांचा अभ्यास चांगला असतो. कांही केवळ सिद्धी साठी प्रयास करतात पण ते कनिष्ठ योगी मानले जातात.
ऋषींना सिद्धींची आसक्ती नसते. ते जनसमुदायापासून दूर असतात. त्यांना शक्यतो मौन आवडते.

मला ते सारे ऐकून भारतातील अशा दिव्य व्यक्तींच्या सहवासाची ओढ वाढली. मी माझ्या मित्राला तसे सांगितले. तो म्हणाला, तुम्ही निश्चित त्यांच्या सत्संगात जाल. मी आपली पहिली भेट झाली, तेंव्हाच आतल्या आवाजाच्या प्रेरणेने ओळखले होते. फक्त कधी, ते सांगू शकत नाही.

मी म्हणालो. आपण दोघे एकत्र जाऊया. तो म्हणाला नाही, तुम्हाला एकट्यालाच जावे लागेल.

मला त्या दिवसापासून भारताविषयीचे आकर्षण जास्तच वाढले. तेथे जाणे, योग्य व्यक्तींचा शोध घेणे, सारे कसे होईल, हे मनात घोळू लागले. मध्येच त्या मित्राच्या अपघाती मृत्यूची दुःखद वार्ता आली.
व्यवसायाची कामे प्रवासाच्या आड येत राहिली.

एकदा माझी गाठ एका मानसशास्त्राच्या प्राध्यापकाशी पडली. तो एक सकारात्मक व खोल विचार करणारी व्यक्ती होता. एका पौर्णिमेच्या रात्री आम्ही जेवण झाल्यावर गपा करीत होतो. तो म्हणाला, अशी वेळ नक्की येणार की, तू भारतातील योगी, तिबेटचे लामा आणि जपानचे झेन साधू यांना भेटशील. त्याविषयीचे तुझे लेखन विशेष असे असेल.

मात्र ते स्वप्न प्रत्यक्षात उतरून मी वर्षाच्या आंत मुंबईच्या अलेक्झांड्रा डॉकला पोचलो.

**पाठ ३. इजिप्तचा जादुगार**

हॉटेल मॅजेस्टीक चांगले हॉटेल म्हणून ऐकले होते. त्यांत एका मोहम्मद बे नामक इजिप्शियन जादुगाराची गांठ पडली. तो डोळ्यांना न दिसणाऱ्या चमत्कृतीपूर्ण गोष्टी करी. सहसा ओळखी वाढविण्याच्या मागे तो नसे. त्याला हॉटेल च स्टाफ जरा घाबरूनच वागे.

मी एकदा हॉटेलच्या एका नोकराबरोबर त्याला चिठ्ठी पाठवून भेटीची इच्छा प्रदर्शित केली. मला पांच मिनिटात बोलावले गेले. तो नाश्ता करीत होता. त्याने त्याच्या समोरच्या खुर्चीकडे निर्देश केला. मला म्हणाला, बसा. मला हस्तांदोलन आवडत नाही.

मला नाश्ता घेणार काय ?असे विचारले. मी आभार मानून चहाचा कप घेतला.

त्याने मला विचारले, मी एकाद्या वृत्तपत्राचा प्रतिनिधी आहे काय? मी नकार देऊन, माझा भारत भेटीचा उद्देश सांगितला. त्याच्या जादूच्या शक्तीबद्दल बोलले जाते, ते मी सांगितले. तो हसला,
अल्लाची मेहरबानी असे म्हणाला. तुम्हाला पहायची कांही करामत? त्याने विचारल्यावर मी अर्थातच होकार दिला.

तो म्हणाला, मी त्या खिडकीकडे जाऊन  पाठ फिरवितो. एका कागदावर प्रश्न लिही. मी प्रश्न लिहिला. चार वर्षापूर्वी मी कोठे रहात होतो?

लिहिल्यावर त्याने त्याच्या बारीक घड्या घालण्यास सांगितल्या. मला ते मुठीत ठेवण्यास सांगून त्याने डोळे मिटले. नंतर कांही वेळाने त्याने माझ्या डोळ्यात डोळे घालून, माझा प्रश्न सांगितला. आणि घड्या उलगडून कागद पाहण्यास सांगितले. त्यावर माझ्या प्रश्नाचे उत्तर लिहिलेले होते. मी आश्चर्यचकित झालो.
मी पुन्हा वेगळे प्रश्न लिहून परीक्षा घेत गेलो. प्रत्येक वेळी त्याने त्याच पद्धतीने बरोबर उत्तरे दिली. मी त्याला हे कसे घडते, आणि कुठे शिकलात असे विचारले. त्याने मला दुसऱ्या दिवशी बोलावले.

मी ठरल्या वेळी गेलो. त्याने त्याची कहाणी सांगितली. मी कैरोत शेतकी शास्त्राचा डिप्लोमा घेत होतो. माझा अभ्यास जोरात सुरु होता. एक दिवस एक वृद्ध ज्यू आमच्या घराशेजारी राहायला आला. त्याचे राहणे अगदी जुन्या जमान्यातले होते. पेहरावात जुन्या फॅशनचा वापर होता. मी त्याशी सलगीचा प्रयास केला. पण तो फटकून राही. त्यामुळे माझी उत्सुकता अधिकच वाढली.

एक गोष्ट चांगली झाली की, त्याने मला त्याच्या घराचे दरवाजे नेहमी उघडे ठेवले. मला लक्षात आले की, त्याचा बहुतेक वेळ तो गूढ अभ्यासात आणि कांही विचित्र साधनांत घालवी. माझी खात्री पटली की, तो अद्भुत संशोधनात गढलेला आहे. सुदैवाने त्याने मला त्याच्या अभ्यासलेल्या गोष्टी शिकविण्याचे कबुल केले. एकदा त्याने मला कैरोतील एका गूढवादी संशोधन करणाऱ्या एका गटात नेले. त्या समुहात अगदी चपराशा पासून ऑफिसर पर्यंत आणि समाजातील विविध क्षेत्रातील विविध स्तराचे लोक होते.

मी तसा नुकताच प्रौढ वयाच्या उंबरठ्यावर होतो. पण मला त्या वृद्ध ज्यू बरोबर जाण्याची अनुमती मिळाली. त्या प्रत्येक भेटीत प्रत्येकाच्या बोलण्याकडे मी अगदी मन लावून लक्ष देई. प्रत्येक लहान सहान गोष्टीची सुद्धा मनात नोंद घेई.
हळू हळू मला त्या गुढ विद्येचे बऱ्यापैकी आकलन होऊ लागले.

प्राविण्य वाढत गेले. मी त्या विषयावर व्याख्याने देऊ लागलो आणि कांही प्रात्यक्षिके सुद्धा दाखवू लागलो. माझी त्या क्षेत्रातली प्रगती इतकी झाली की, त्यांनी मला त्यांच्या संस्थेच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती केली. तब्बल १२ वर्षे मी त्यांचे नेतृत्व करीत होतो. नंतर मी राजीनामा दिला. कारण मला इजिप्त सोडून बाहेरच्या देशांना भेटी द्यायच्या होत्या.

मोहम्मद बे बोलण्याचे थांबला. त्याने सिगारेटची राख झटकली. मंद स्मित केले. सध्या मी माझ्या विद्येवर भरपूर कमावतोय. पुरेसा पैसा जमला की, सारं सोडून कुठेतरी अज्ञात जागी जाऊन उरलेलं जीवन शांतपणे काढायचं ठरविलेलं आहे.


त्याच्या बोलण्यातून समजलं की गंभीर गुन्हे करणाऱ्या अपराध्यांना शोधून काढण्यासाठी बे ची मदत घेतली जाते. तो त्यासाठी त्याच्या पिशाच्चांची मदत घेतो. अशी अदृश्य फौज त्याकडे पुरेशी आहे. अगदी त्याच्या मृत भावाचाही त्यात समावेश आहे.

त्याने घड्याळाकडे पहिले आणि म्हणाला, आता माझा वेळ दुसऱ्या कामासाठी आहे. आणि निरोप घेऊन झपाट्याने तो गेला.

*

मुंबईत मला रात्री उशीरा झोप येई. मला त्या दमट हवेत गुदमरल्यासारखे होई. मी मोहम्मद बे चा विचार करीत अंथरुणावर पडलो.

पाठ ४ था **देवदूताची भेट [अवतार मेहेरबाबा]**



**मेहेरबाबा**

मेहेरबाबांना भेटणारा मी पहिलाच पाश्चिमात्य होतो.
अहमदनगर स्टेशन वरून ७ मैलावर अरणगाव जवळ , कृत्रिम दगडी गुहेसारख्या निवासात बाबा राहत होते. परिसराच्या रम्यतेवरून या पारशी बाबाचे निसर्गप्रेम दिसून येत होते. त्यांचे मुख्य निवासस्थान नाशिक जवळ होते. कुटीच्या प्रवेशाशी दोन रखवालदार होते. आम्हाला पाहून ते आंत गेले. मिनिटभरात मला या अवतार मेहेर बाबांचे दर्शन झाले.

अपेक्षेहून बाबा वेगळे वाटले. मला कां कोण जाणे त्यांच्या भेटीच्या प्रसंगी शरीरावर रोमांच वगैरे जाणवले नाही. जसे  कुणा दिव्य अस्तित्वाच्या परिसरात जाणवते.
त्यांचा पेहराव स्वच्छ पांढरा, परंतु जरा जुन्या फॅशनचा वाटला. लांब मऊ केस मानेपर्यंत रुळत होते. त्यावर रेशमी चमक होती. नाकाची ठेवण अगदी वेगळी लांबसडक वाटली. खाली मोठाल्या मिशा. डोळे काळे. पण त्यात प्रभाव वाटला नाही.

तुम्हाला भेटून आनंद वाटला, या शब्दांनी माझे स्वागत झाले. पण ते शब्द ओठातून आलेले नव्हते. जुलई १९२५ पासून बाबा मौनात होते. त्यांच्याजवळ अक्षरांचा एक तक्ता होता. त्यातील अक्षरांकडे निर्देशक फिरवीत त्यांचे विचार व्यक्तीकरण असे.

बाबांनी याच पद्धतीने माझी इंग्रजीत चौकशी केली. मी एक आठवडाभर राहणार होतो.  मला एक बाजूची दगडी खोली देण्यात आली.

आमची समोरासमोर मुलाखत झाली. बाबाच्या म्हणण्यानुसार मानवाला एका विशिष्ट उंचीवर नेण्यासाठी त्यांचे जीवन कार्य आहे. ते सांगत, मी जगाचा इतिहास बदलून टाकीन. येशू प्रमाणे अध्यात्माची शिकवण मी जगाला देणार आहे. पण योग्य वेळेची वाट पाहत आहे. जगात सर्वत्र अनाचार बोकाळला आहे. पंडित दिशाभूल करीत आहेत. म्हणून देवाने मला पाठविले.

मी शांतपणे, अगदी मोकळ्या मनाने, सुस्मित मुखाने ऐकत होतो, त्यांचे सगळेच बोलणे पटत होते, असे नव्हे. पण मी प्रतिक्रिया देत नव्हतो.

बाबा पुढे सांगू लागले, देवदूतांचे कांही नियम व पद्धती असतात, ज्याद्वारे ते मार्गदर्शन करतात. माझी शिकवण देण्यासाठी मी कोणताही नवा धर्म वा पंथ स्थापणार नाही. जग भरपूर प्रगत आहे. ते लहान वाटू लागून आता जवळ आलेले आहे. त्यामुळे संदेश वहन जलद झालेला आहे.

मी विचारले, आपण जगाला तुमच्या मिशनची ओळख कधी करून देणार आहात?
त्यासाठी मला मौन सोडावे लागेल. अर्थात मी निवडलेली वेळ अशी असेल की, जगातील अनास्था आणि गोंधळ थांबविण्यासाठी मला ते करावेच लागेल.

मी तारीख आणि वेळ विचारली.
बाबा म्हणाले तो दिवस जास्त लांब नाही. पण मी निश्चित दिवस सांगू इच्छित नाही. जगांत अस्थिरता असेल. नैसर्गिक आपत्तीने थैमान घातलेले असे. पण माझ्या पद्धती आणि अध्यात्मिक शक्ती यांनी मी त्यावर मात करीन.

बाबांचे संभाषण संपले. बाबांचा सेक्रेटरी आला. त्याच्या चेहऱ्यावर बाबांच्या बोलण्यातील प्रभाव स्पष्ट जाणवत होता. त्याचे हावभाव असे दाखवीत होते की, किती प्रभावी व्यक्तिमत्व आहे बाबा ! पहिलेत ना?

बाबांची बोटे परत शब्दांच्या तक्त्यावरून फिरू लागली. युद्ध छेडले जाईल. जगात अशांती माजेल. मी तेंव्हा जगभर फिरेन. अनेक राष्ट्रे माझ्या प्रतिक्षेत असतील. जगाच्या कानाकोपऱ्यात माझी शिकवण जाईल.
मी विचारले, तुमची मायभूमी भारताचे काय?

जोवर जाती धर्माचे खूळ पूर्णतया भारतातून जाणार नाही, मी शांत बसणार नाही. भारत पुन्हा जगात पुढच्या स्थानावर असेल. कांही झाले तरी भारत अध्यात्मात अग्रेसर आहे. येथूनच अध्यात्माचे विविध प्रवाह निघाले. आणि जगभर पसरले.
माझी बलवान अध्यात्म शक्ती जगाला तारील.

मी शांत बसलो गुहेबाहेर नजर टाकली. दूरवर डोंगरांच्या ओळी निळ्या आभाळापर्यंत भिडल्या होत्या.
मी बाबांना प्रश्न केला, तुम्ही युरोपला तुमच्या अध्यात्मिक अधिकाराविषयी कशी खात्री पटवाल.?
जनसामान्यांना तुमची शिकवण हास्यास्पद वाटली तर?

तुम्हाला बदलत्या वेळेचा अंदाज नाही. बाबा उत्तरले. मी जेंव्हा माझ्यातील अवतार कार्याची आणि मी देवाचा दूत असल्याची वार्ता प्रसारवीन तेंव्हा, सर्वांना याची निश्चित खात्री पटेल. मी जगाला चमत्कार दाखवू इच्छित नाही.

बाबांनी बरेच चमत्कार केलेले आहेत ! सेक्रेटरी माझेकडे पाहत म्हणाला.
मी उद्गारलो, म्हणजे नेमके काय?
सेक्रेटरी सांगण्याआधी बाबा म्हणाले, विष्णू, आताच नको. नंतर कधी सांग. त्यांना आपल्या अनुयायांना भेटू दे. पुष्कळ काही कळेल. ते आहेत कांही दिवस.
*
सायंकाळी मला बाबांची आरती चाललेली दिसली. दुसऱ्या दिवशी मला बरीच माहिती मिळाली. बाबाचे नांव मेहेर. स्वतःला सद्गुरू मेहेरबाबा म्हणवून घेतात. वडील पारशी.बाबांचा जन्म १८९४ मध्ये पुण्याला झाला. एकदा कॉलेजमधून येतांना त्यांना एक मुस्लीम वृद्ध फकीर भेटली. तिचे नांव हजरत बाबाजान. तिने त्याला कुरवाळले. त्याचे हात हातात घेतले. आणि कपाळाचे चुंबन घेतले.

घरी आलेला मेहेर अगदी वेगळा होता. पुढचे आठ महिने त्याचे अभ्यासात लक्ष लागेना. शेवटी शिक्षण सोडले. त्यानंतर मेहेरची मानसिक अवस्था अगदी वेगळी होती. जेवण, खाणे, कशातच मन लागत नव्हते. वडिलांनी आग्रह केल्यावर कसेबसे चार घास यंत्राप्रमाणे पोटात ढकलले जायचे.

मुलतः हुशार असलेल्या २० वर्षाच्या मेहेरला मानसिक नैराश्याने कसे गाठले, याने पालक चिंताग्रस्त झाले. अनेक डॉक्टर, उपाय करून थकले. यांतून सावरलेला मेहेर मात्र सामान्यांसारखा नव्हता. शिक्षण नावडते झाले होते. खेळ नकोसे वाटत होते. पण अध्यात्मिक भूक जबरदस्त वाढली होती.

हे सारे घडले होते त्या फकीर अवलिया स्त्रीच्या कपाळावरल्या चुंबनाने. त्या वृद्ध स्त्रीकडे मेहेर पुन्हा गेला. तिने त्याला अध्यात्मिक गुरुचा शोध घेण्यासाठी पाठविले. खूप पायपीट केल्यावर उपासनी बाबा भेटले, आणि मेहेरला गुरु लाभले.

उपासनी बाबांचा साकोरीला मठ होता. तेथे बरेच दिवस सत्संग झाल्यावर गुरुकृपेचा वर्षाव झाला. मेहेर आता सद्गुरू मेहेरबाबा झाले. शिष्य परिवार गोळा झाला. १९२४ मध्ये मेहेरबाबा पाच सहा शिष्यांसह पर्शियाला गेले. पण बोट बुशायरच्या बंदराला लागताच, दुसऱ्याच बोटीने परतीचा प्रवास करायचा असा बाबांनी आदेश दिला. तीन महिन्यांत  तेथे राज्यक्रांती झाली. नवा शहा राज्यावर आला. हे सारे बाबांच्या एका भेटीत घडले आणि आता पर्शिया आनंदात आहे असे त्यांच्या अनुयायांनी सांगितले.

मेहेरबाबांनी अरणगाव येथे एक शिक्षण संस्था अनुयायांच्या मदतीने उभारली. बरीच जागा खरेदी केली गेली. आजूबाजूला बंगले उभे झाले. विनामूल्य शिक्षण देणे सुरु झाले. जेवण बोर्डिंग सुद्धा विनामूल्य होते. शाळेत धार्मिक शिक्षणही देण्यात येई. सर्व धर्मीय शाळेत घेतले गेले. या उपक्रमाने मुलांची मोठी फौज दिमतीला उभी राहिली.

शाळेच्या जोडीला एक हॉस्पिटल सुरु झाले. विनामूल्य औषधे देणे सुरु झाले. अंध, महारोगी आणि अन्य दुर्धर रोगाचे रुग्ण यांना दिलासा मिळाला. भक्त गण आणि अनुयायी वाढू लागले. भेटी देणारे वाढले. खूप गवगवा झाला. मेहेरबाबा अवतारी मानु जाऊ लागले.

पण अचानक, सुरु झाल्यापासून १८ महिन्यात कॉलनी बंद केली गेली. मुलाना परत पाठविण्यात आले. असे कां? याचे उत्तर मेहेराबाबांकडे कुणी विचारू शकत नव्हते.

१९२९ च्या उन्हाळ्यात बाबाचा एक शिष्य साधू लेक भारत भ्रमणाला जाऊन बाबांच्या महानतेचा प्रसार करण्यास गेला. पण तो फक्त मद्रासलाच काही कार्य करू शकला.

*

बाबांनी मला एका चर्चेत सांगितले, मी ३३ वर्षे कार्य करीन, नंतर माझेच पारशी बांधव माझ्या दुर्दैवी मृत्यूला कारण होतील. माझ्या निवडक १२ शिष्यांपैकी एक या कार्याची धुरा सांभाळील. त्यांच्या पापांचा नाश होण्यासाठीच, मी आता मौन धरून आहे.

बाबा म्हणाले, तूं पश्चिमेत माझा प्रतिनिधी म्हणून जाऊन माझ्या कार्याचा प्रचार कर. मी म्हणालो, लोक मला वेडा समजतील. मेहेरला हे पटेना. तो म्हणाला माझ्या संगतीत राहा आणि मी तुझ्यात शक्ती प्रोक्षण करीन.

मी उत्तर दिले नाही. मेहेरही शांत होता.


*

मला वाटते, मेहेर मोठेपणा मिळविण्यासाठी प्रसारमाध्यम शोधतोय. मी दुसऱ्याच दिवशी निघण्याचा निर्णय घेतला. सामान बांधले. मी मेहेराचा निरोप घेऊन निघणार, तेवढ्यात मेहेर म्हणाला, थोड्याच दिवसात त्याचे निवास नाशिकला हलवणार आहे. मी एक महिना त्याचेबरोबर राहावे. अध्यात्माचे चमत्कार अनुभवशील. मी यावर विचारपूर्वक निर्णय घेण्याचे ठरविले.

*

मुंबईहून मी पुण्याला जाण्याचे ठरविले. तत्पूर्वी ज्या मुस्लीम साधू स्त्रीने मेहेरचे जीवन बदलले, तिला भेटावेसे वाटले. तिची माहिती काढली. जिचे वय मला मेहेरचे अनुयायी १३० सांगत होते, ती ९५ वर्षांची होती. एका न्यायाधीशाकडून मला तिची बरीच माहिती मिळाली.

उपासनी बाबाच्या सल्याने अनेकांचे जीवन उध्वर्स्त झाल्याचे कळले. त्या वृद्धेबद्दल मात्र आदरभावाने बोलले जात होते.



मी पुण्याहून त्या महिलेकडे गेलो. ती खाटेवर पडलेली होती. जराजर्जर अति क्षीण झाली होती. सुरकुतलेला देह, तिच्या शुभ्र चमकदार केसांशी विशोभित होता. डोळे निस्तेज आणि अगदी शून्यवत् भाव असलेले होते.
मी माझी ओळख करून दिल्यावर तिने तिच्या अस्थिपंजर हाताने माझा हात घट्ट धरला. २-४ मिनिटे तसाच ठेऊन, तिने मंद आवाजात मोठ्या कष्टाने असे सांगितले की, मला भारतात बोलावण्यात आलेले आहे.मला लवकरच हे समजेल.

दुबळा देह आणि अध्यात्मिक स्तर यांचे नेमके काय समीकरण असावे? हे मला उमगत नव्हते. पण तिचे सात्विक दैवी अस्तित्व नक्कीच त्या देहात वास करीत होते. मरणाच्या दाराशी पोचलेले तिचे वार्धक्य आणि दुबळी अवस्था यामुळे जास्त वेळ थांबता येणे शक्य नव्हते. मी पुण्याला परत गेलो. मी स्वतः भारतात आलेलो होतो, मग मला बोलावण्यात आलेले आहे, असे त्या बाई का म्हणाल्या याचा विचार पिच्छा सोडीना.

पाठ ५ वा **अड्यार नदीच्या किनारी.**

सरकत्या काळाबरोबर मी भारतात दक्षिणेकडे बऱ्याच प्रख्यात जागी जाऊन आलो. काही नामवंत व्यक्तींच्या भेटी घेतल्या. मी मद्रासला जाणाऱ्या ट्रेन मध्ये बसलो आहे. काही काळ त्या आजूबाजूचा परिसर पायाखाली घालावा असे वाटते.
फिरती खूप झाली, पण अजून ज्याला योगी म्हणता येईल, असे प्रभावशाली कुणी भेटले नाही. मनाशी बाळगलेले तेजस्वी ऋषी अजून तरी दिसले नाहीत.
गर्दीच्या वेढ्यातले मद्रास मला आवडले. रंगी बेरंगी परिसर, धावपळ, यांनी ते शहर गजबजले होते. मी जरा दोनेक मैल दूर वास्तव्य केले. बाजूला ब्राह्मणांची पांढरा रंग ल्यालेली वस्ती होती. रस्त्यावर वाळूचा थर होता. चालताना बूट त्यांत खाली खाली जात.

अर्ध्या तासाच्या अंतरावर तिरावरल्या पाम वृक्ष्यांच्या मधून अड्यार नदी वाहत होती. एका ब्राह्मणाबरोबर मी नदीवर गेलो. त्याला माझ्या प्रवासाच्या उद्देशाची चांगलीच कल्पना आलेली होती. माझ्या खांद्याला धरून तो माझ्या कानाशी हळूच पुटपुटला, तो समोरून नदीतून स्नान करून येणारा तरुण दिसतोय ना, तो योगी आहे. पण तो कुणाशी बोलत नाही. अगदी एकलकोंडा आहे. सारा जिल्हा त्याला ओळखतो.

आमचे बोलणे होतच होते. ती व्यक्ती आमच्यापाशी पोचली. छान बळकट शरीर. मध्यम अंगकाठी, काळी पण तेजस्वी अंगकांती. पस्तीसच्या जवळपासचे वय. डोळे जमिनीकडे जणू काही शोधतोय, की चालते ध्यान करतोय? माझी त्याकडे ओढ वाढत गेली.

मला त्याशी बोलायचं, मी म्हणालो. पण ब्राह्मणाने मला धरून ठेवले. मला म्हणाला, काही उपयोग नाही. मला प्रयत्न तर करुद्या. मी उत्तरलो, आणि त्याचे मागोमाग जाऊ लागलो. तो त्याच्याच नादात. आमच्या चाहूलीचीही दखल घेतली नाही. तो त्याच्या वेगळ्या जगात होता.

जरा त्यांना विचारा, मी माझ्या ब्राह्मण मित्राला म्हणालो. पण त्याचा धीर होईना. मला ही आयती सामोरी आलेली सुवर्णसंधी सोडायची नव्हती. मी सरळ पुढे गेलो आणि त्यांच्या समोर उभा राहिलो. पण भाषेची अडचण. माझ्या सहकाऱ्याने भीत भीत तामिळ मध्ये त्यांना कांही सांगितले. योगी शांत. डोळे थंड. परक्याकडे पाहावे तसे.

ब्राह्मण माझ्याकडे पाहिलंस ना, कांहीही उपयोग नाही. अशा चेहऱ्याने पाहू लागला. असा शांत अवधी गेला. किंकर्तव्यमूढ अवस्था झाली. या योग्यांना त्यांचे मौन भंग झालेले अजिबात खपत नाही. आता काय करायचे?
मला आंतून जाणवले, हा योगी आता माझी आतली तयारी तपासतोय.
ब्राह्मण चांगलाच नर्व्हस झाला. मला निघायला खुणावू लागला.

योग्याने त्याच्या हातच्या काही विशिष्ट हालचाली केल्या. आम्हाला जवळच्या एका पाम झाडाकडे चालण्याचा निर्देश दिला. तेथे जाऊन खाली बसत आम्हालाही बसायची खूण केली.
त्याने तमिळ मध्ये ब्राह्मणाला कांही सांगितले. आवाज मधुर होता. मला ब्राह्मण म्हणाला. त्यांनी तुझ्याशी बोलायला तयारी दाखविली.

मी त्यांना नांवाची  विचारणा केली. कांहीतरी लांब लचक नांव ऐकून मला फक्त ब्रह्मसुगंध हा शब्द समजला. मला हेही समजले की,त्यांना ब्रह्म म्हटलेले आवडेल.
मी माझा योगाविषायीची जिज्ञासा सांगितली. त्याने हंसून, ते मी केंव्हाच ओळखले असे सांगितले. आणि प्रश्न विचार, असे सुचविले.

तुम्ही कोणत्या योग पद्धतीचा अवलंब करता ? मी.



BRAMA SITTING IN HIS FAVOURITE YOGA POSTURE

ब्रह्मा बोलू लागले, शरीर संयम ही योगातील आचरण्यात कठीण पद्धती मी अवलंबितो. शरीर आणि श्वास यांचे संतुलन एकाद्या गाडीला जोडलेल्या बैलजोडीसारखे हवे. त्यावर उत्तम नियंत्रण हवे. मग शरीर यंत्रणा आणि मन यांचेवर उत्तम नियंत्रण येऊ शकते.
नेमका कसा फायदा होतो ? मी.
दूर नदीच्या प्रवाहाकडे पाहत ब्रह्मा उत्तरला, शरीराचे आरोग्य, इच्छा शक्तीची ताकद आणि काळाची वाढलेली लांबी हे याचे कांही फायदे.
ज्याला हे उत्तम जमले तो योगी शरीर पोलादासारखे बनवू शकतो.
वेदनेचे नावही उरत नाही. अगदी भूल न देता ऑपरेशन केले तरी. ऋतू कोणताही असो त्याला नित्य आनंदच वाटतो.
"If a Yogi enters into such a posture and then practices  a certain breathing exercise, he will become more  youthful."

मी माझे नोटबुक काढून भराभर लिहू लागलो. ब्रह्माने स्मित केले. पण अडविले नाही.
माझे गुरु हिमालयात खुल्या वातावरणात रहात. भोवती बर्फ असे. त्यांची फक्त एक भगवी कफनी असे. एकाच बर्फाळ जागी तासंतास बसूनही त्यांना कांही होत नसे. योगाची शक्ती अशी असते.

तुम्ही अध्यापही शिष्य आहांत. -मी.
हो अजून बरेच डोंगर पार करायचे आहेत. गेली १२ वर्षे साधना चालू आहे.- ब्रह्मा

मग काही अगम्य शक्तींचा लाभ? - मी.
ब्रह्मा यावर शांतपणे मान डोलावतात.

मी- हरकत नसेल तर कृपया सांगा, आपण योगाकडे कसे वळालात ?
थोडा वेळ शांत बसून हात शालीखाली घेऊन, ब्रह्मा समोर नदी पलीकडे अंतराळात बघत म्हणाले, मी अगदी शांत आणि एकाकी मुलगा होतो. इतर मुलांसारखा मला खेळांत किंवा कांही छंदात रमणे आवडत नसे. बगीच्यात फिरणे, शेतात हिंडणे मला आवडायचे.

वयाच्या १२ व्या वर्षी कुणीतरी योगाबद्दल बोलतांना मी प्रथमच ऐकले. माझी उत्सुकता चांगलीच जागृत झाली. तहानलेल्याने पाणी शोधावे तसे, मी योगाबद्दल माहिती गोळा करू लागलो. तामिळ भाषेतील कांही पुस्तकांतील माहिती मला फारच उद्‌बोधक वाटली. जिज्ञासा वाढू लागली.

एका पुस्तकात म्हटले होते, योगा शिकणे यासाठी गुरु आवश्यक असतो. मी विचार केला, घरात बसून गुरु थोडाच मिळणार? वाचून केलेल्या काही श्वसन क्रियांनी मला फायदा होण्याऐवजी नुकसान झाले. पण माझ्यातील उत्सुकता शांत बसेना, गुरु पडेपर्यंत चूप काय बसायचे, म्हणून मी प्रयोग चालू ठेवले. कांही वर्षांनी मला फायदे दिसू लागले.
मला बारीकसे खरचटल्या सारखे कांहीसे डोक्यावर आले. मला वाटले, कवटीला नाजूक जागी इजा झाली की काय? त्यातून रक्त येऊन माझे शरीर थंड आणि बधीर झाले. मला वाटले अंतकाळ जवळ आला. दोनेक तासांनी एक विलक्षण तेज माझ्या मनाच्या नजरेसमोर चमकून गेले. कुणी योगी माझेसमोर दिसला. मला म्हणू लागला, बघ, आता कशी भयानक परिस्थिती तू स्वतःवर ओढवून घेतली आहेस. गुप्त साधना अडाण्याने करू पाहिल्यावर असेच होणार ! हा तुला शिकण्यासाठीचा कडक धडा आहे. ते दृश्य थोड्या वेळाने विरले. पण माझ्यात सुधारणा होऊ लागली. कांही काळात मी पूर्ववत झालो. अजूनही तो व्रण डोक्यावर आहे.

ब्रह्माने ते दाखविले. एक गोल व्रण टाळूपाशी स्पष्ट दिसत होता.

या घटनेनंतर मी श्वसनाचे प्रयोग थांबवले. अनुकूल परिस्थिती पाहून एकदा गुपचूप घर सोडले. निदान दहा शिक्षक पहिले, त्यांच्या संगतीत राहिलो पण निष्फलता दिसल्यावर पुढे जात राहिलो. पुष्कळांना केवळ पुस्तकी ज्ञान होते. मला अनुभूतीचे ज्ञान हवे होते.

शोध घेता घेता मी तंजावरजवळ एका खेड्यात गेलो. नदीत स्नान केले. तीरावरून जात होतो. लाल दगडांच्या एका लहान देवळापाशी आलो. आंत शिरलो. एका फक्त लंगोटी घातलेल्या व्यक्तीभोवती घेर धरून बरेच जण दिसले. ते सारे आदराने त्याकडे पाहत होते. त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज होते. गुढतेचे वलय होते. मला जाणवले की, हेच खरे योगी.

एकाएकी त्यांनी माझेकडे नजर टाकली. आमची दृष्टिभेट झाली. माझा अंतःप्रेरणा झाली. आणि मी तिकडे ओढला गेलो. मला गुरूंनी मिठीत घेतले. खाली बसविले. आणि म्हणाले, सहा महिन्यांपूर्वीच मला तुझी भेट घेण्याचे आदेश होते. तू आज आलास छान झाले !

माझे गुरु या क्षेत्रातील उच्च स्तरावरील योगी होते. शरीरावर नियंत्रणाद्वारा त्यांनी योगसाधना केली होती. मला त्या सोबत श्वसन नियंत्रण क्रियांच्या विशिष्ठ पद्धतीही शिकविण्यात आल्या. मी कधी ४० दिवस उपवास सुद्धा केलेले आहेत.

एके दिवस मला गुरुजी म्हणाले, तू संसारातून पुरती निवृत्ती अध्याप घ्यायची वेळ आलेली नाही. समाजात परत जा. सामान्य जीवन अनुसर. तुझे लग्न होईल. एक मुलगा होईल. वयाच्या ३९व्या वर्षी तुला कांही सूचना येतील आणि नंतर मात्र तू पुरते वैराग्य स्विकारशील. त्यानंतर तुला पुढच्या प्रगतीसाठी जंगलात पाठविले जाईल. मी तुझी वाट पाहीन.

मी आदेशाचे पालन केले. गुरुजींची भविष्यवाणी पुरती खरी ठरली. पण थोड्याच दिवसात माझी पत्नी आणि मूल मरण पावले. माझे आईवडील केव्हाच जगांतून गेले होते. मी माझे गांव सोडले. आता मी एका वृद्ध विधवा स्त्रीबरोबर राहतो. मला बालपणापासून ती ओळखते.

ब्रह्माने बोलणे थांबवले. माझे कान तृप्त झाले. माझेजवळ प्रश्न शिल्लक नव्हते. २-३ मिनिटे पूर्ण शांतीत गेली. योगी उठले. घराकडे तोंड केले. आणि शांतपणे चालणे सुरु केले. मी आणि ब्राह्मण मागोमाग गेलो.

छानदार हवा सुटली होती. आधी गेलेल्या रम्य एक तासाने वातावरण आल्हाददायक वाटत होते. एका ठिकाणी ब्रह्मा वळले आणि आम्हाला निरोपादाखल हात हालाविला. मी म्हणालो, आम्हाला पुन्हा भेटण्याची अनुमती असावी. त्यांनी त्याच दिवशीच्या सायंकाळी  भेटण्याची सूचना दिली. माझ्या ब्राह्मण मित्राला आश्चर्य वाटले.

*

भेटीची अनुमती येताच, त्या सायंकाळी मी हात जोडून योगी महाराजांना नमस्कार केला. दोन्ही हात जोडून नमस्काराचा अर्थ आहे, माझा आणि तुझा आत्मा एकच आहे.

ब्रह्मा मला एका मोठ्या खोलीत घेऊन गेले. तेथे जमिनीवर मांडी घालून बसले. आपण दिवाणवर कां बसत नाही? मी विचारले. मला मऊ आसन नको. असे त्यांनी सांगितले. मी भेटीबद्दल आदर व्यक्त करून कांही खाद्यपदार्थ सादर केले. त्यांनी शांतपणे स्विकारून, त्याचा आस्वाद घेतला.

खाणे झाल्यावर ब्रह्माला मी माझ्या प्रवासाबद्दल कसे आणि काय घडत गेले हे थोडक्यांत सांगून प्रवासाचा उद्देश सांगितला. ब्रह्माने माझ्या खांद्यावर हात ठेवले आणि म्हणाले;

पश्चिमेत अशा गोष्टीत उत्सुकता आहे. मला आनंद वाटला. चला, तुमचा प्रवास व्यर्थ गेला नाही. ते म्हणाले. अर्थात अजून बरंच शिकायचं बाकी आहे. नियतीचे आभार की, आपली भेट घडवून आणली. जे जे प्रश्न आणि शंका मनात असतील ते विचार. मला माझी बंधने पाळून जेवढे शक्य आहे, तेवढे सांगेन .

मला भाग्य उजळल्यासारखे वाटले. मी त्यांना योगपद्धतीबद्दल, त्याचा इतिहास आणि उद्देश विचारले.
ब्रह्मा सांगू लागले, मुख्य ग्रंथ घेरंड संहिता,आमचे शास्त्र सांगते, भगवान शिव या शरीर नियंत्रण योग पद्धतीचे जनक आहेत.
त्यांचेकडून मार्तंडेय आणि पुढे अनेक शिकले. हजारो वर्षांची याला परंपरा आहे.
या शरीर नियंत्रण योग पद्धती बद्दल फारच थोडे ठीक जाणतात. बाकी गैरसमज भरपूर आहेत. बनारसला जा, तेथे खिळ्यांच्या वर बसणारे आणि झोपणारे भेटतील. कोठे एक हात हवेत उंच करून पुरता निकामी करतात. हा योग नव्हे. योग म्हणजे शरीराला त्रास देणे नव्हे. पण जन सामान्य अशा मूर्खांना अन्न, पैसे देऊन नमस्कार करतात.
पण जर खरे योगी दडून बसले तर त्यांना दोष कसा द्यायचा ?- मी.

# गूढ भारताचा शोध {पॉल ब्रन्टनच्या पुस्तकाचा संक्षिप्त अनुवाद}

कुणी राजा आपले मौल्यवान जड जवाहीर रस्त्यावर ठेवील का ? त्याची जागा खजीन्यातच असते ना ? आमच्या शास्त्राचे ज्ञान हा अमुल्य खजिना आहे. आम्ही त्याला बाजारात कसे ठेवणार ? जो पात्र आहे आणि त्याची गरज आणि कदर आहे, त्याला तो गुप्त खजिना शोधावा लागतो. हा एकच मार्ग आहे. योगाच्या अनेक पद्धतीत काही धोकेही आहेत.
या शास्त्रात एक शाखा अशी आहे जिच्याने इच्छा शक्ती आणि शरीर दोघांना फायदा होतो.त्यानेच योगातील कठीण साधना करण्याची क्षमता लाभते. याचा नवशिक्यांना नक्की उपयोग होईल. आणि प्रगत शिक्षणाची पात्रता लाभेल.

निसर्गात निरोगी जनावरे ज्या शरीर क्रिया करतात त्यांतील कांहींचा आम्ही योगक्रियेत समावेश केला आहे. आता मांजर पहा. तिच्याभोवती कोंडाळे करून तिला मध्यभागी ठेवले तेंव्हा, दुपारच्या गर्मीत तिला झोपायचे असते तेंव्हा, उंदराच्या बिळाशी ती दबा धरून बसते तेंव्हा, ती कशी शरीर क्रिया करते ते नीट अनुभवा. तिची झोपण्याची पद्धती ही अगदी आदर्श विश्रामाची योगक्रिया आहे. मांजरीला शरीराच्या शक्तींच्या प्रत्येक जागांचे संगोपन पूर्ण माहित असते.















**मांजर योग शिक्षिका**

बाळाकडून शिका योग











आपण झोपतो, त्यांत शरीराच्या कोणत्या भागाला कसे ठेवायचे, याकडे दुर्लक्ष करतो. तुम्ही खुर्चीत बसता, कधी इकडे वळता, कधी तिकडे. कधी पुढे, कधी मागे. कारण कशा पद्धतीत नैसर्गिक विश्राम आहे हे ठाऊक नसते. तसेच उठण्याच्या पद्धती सुद्धा अयोग्य असू शकतात. योग तुम्हाला नैसर्गिक वळण शिकवतो. तुमच्यातील शक्तींचा गैर वापर टाळतो. त्या जतन करवितो.

जनावरांना पूर्ण माहित असते, विश्रांती कशी घ्यावी. कारण ते अंतर्मनाच्या सूचना पाळतात. थंड हवेत खुर्ची भले उपयोगी असेल, पण तिच्याशिवाय राहणे योगाने जमते.

उत्तम बसण्याच्या पद्धतीने पूर्ण शरीराला खरा विश्राम मिळतो. शिकण्याची एक पद्धत म्हणजे, एखादे कांबळे, किंवा चटई भिंतीलगत ठेवावी. त्यावर आपल्याला वाटेल तसे आरामशीर बसावे. भिंतीचा वापर पाठीच्या आधारासाठी करावा.  किंवा खोलीच्या मध्यावर चटई ठेवावी. मागे पुढच्या बाजूला वळण्यासाठी खुर्ची किंवा जड सोफा ठेवावा. नंतर पाय गुढघ्यात आंत ओढावे. आणि नंतर मांडी घालावी. ताण वाटता कामा नये. पूर्वीचे शिंपी असेच बसायचे. स्नायू अजिबात ताणून धरू नये. शरीर सहन होईल इतका वेळच त्या स्थितीत पाठीचा कणा सरळ आणि निश्चल राहील असे ठेवावे. श्वसन हळुवार सहज असावे. मनाला सूचना देऊन विचार रहित असावे. जगाचे ओझे, ताण, चिंता, काही नको. मन रम्य अशा चित्र, फूल, ई. गोष्टीवर स्थिर करावे. जसजशी संवय होईल तसतसे खऱ्या विश्रामाचे सुख मिळते.

ही स्थिती अत्यंत विश्रामदायक आहे. खूप वेळ उभे राहिल्यावर पायांवरचा ताण याने निघून जातो. यात लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी की, शरीराचा भार शक्यतो बैठकीच्या जागी टाकावा. याचा सराव काही मिनिटे करावा.



**शवासन-**

सरावाने यांत एक तास सुद्धा सहज राहता येते. तणाव अगदी निघून जाऊन खरा विश्राम मिळतो. स्नायू शिथिल झाले की, मनही शांत होते.पद्धती कोणत्या का असेना, शरीराचे शिथिलीकरण ही योगाची आवश्यकता आहे.

पाठीवर सपाट झोपावे. पाय सरळ खाली पसरलेले. हात सरळ खाली, शरीराच्या बाजूला. हाताचे  पंजे पसरलेले. पायांचे बोटांचे पंजे(टोज) बाहेर वळवा. स्नायू शिथिल करा. डोळे बंद. शरीराचा सारा भार जमिनीवर. हा व्यायाम गादीवर नीट जमणार नाही. खाली चटई किंवा सतरंजी अंथरून करावा. पाठीचा कणा अगदी सपाट हवा. निसर्ग तुमच्या शरीरातील तणाव काढायला मदत करील.याला **शवासन** म्हणतात.

त्या दिवसाची बैठक संपली. अशा अनेक बैठकी झाल्या. एक जाणवले की, सूर्याच्या सान्निध्यापेक्षा चंद्राचे सानिध्य ब्रह्माला अधिक बोलके करायचे.
योगाला सुयोग्य श्वसन पद्धतीची जोड मिळाली,की, योग्याचे तारुण्य वाढते. कांही योग, निसर्गाच्या सुप्त शक्ती जागृत करतात. कांही शरीरातील मळ आणि अशुद्धी बाहेर काढतात. कांही रोगांवर उपचार करतात. मन आणि शरीर दोहोवर नियंत्रण मिळविणे हा योगाचा उद्देश आहे. शरीर ठराविक तऱ्हेने वाकणे आणि वळविणे यांनीच बद्ध ग्रंथी सुट्या होतात.


योगाचा उद्देश केवळ बलवर्धन हा नसून सहनशीलता वाढविणे; ज्याला तितिक्षा म्हणतात, हा आहे. योगात घिसाडघाई चालत नाही, तर हळू हळू देहाला वळण लावणे महत्वाचे असते.



पश्चिमोत्तानासन

ब्रह्माने एक उपयुक्त योग प्रकार सांगितला.
योगी दोन्ही पाय जोडून- पसरून बसतो.दोन्ही हात डोक्याचे सरळ वर करतो. नंतर धडासहित डोके व हात हळू हळू पुढे वाकवित तर्जनीच्या (अंगठ्याशेजारील बोट) वाकविलेल्या हुकात पायाच्या अंगठ्याला अडकवायचे. उजव्या अंगठ्याला उजव्या तर्जनीने आणि डाव्याला डाव्या तर्जनीने. या नंतर डोके हळूच दोन्ही हाताच्या मध्ये आणि मांड्याशी स्पर्शिलेले राहील.

यांत कोठेही, सारे एकदम जमेल अशा तऱ्हेने न करता, जमेल तसे सहनशीलता वाढवित, पूर्णत्व गाठायचे. डोके धडासहित जेवढे गुढग्याकडे वाकेल तेवढे वाकवून सहन होईल तितका वेळ स्थिर करावे हळू हळू वाढवित न्यावे. पुरता योग जमायला कांही आठवडे लागतील. पण संवय झाली की, सहज करता येईल. याने पाठीचा कणा बलवान होऊन रक्त अभिसरण सुधारते.



दुसऱ्या प्रकारात , ब्रह्मा जमिनीवर बसून उजवा पाय डाव्या मांडीवर आणि डावा उजव्या मांडीवर अशी मांडी घालून त्याचे धड मागे नेत जमिनीला टेकविले. त्यानंतर दोन्ही हात डोक्याचे मागे नेऊन त्यांना क्रॉस करून डोक्याखाली त्यांची उशी केली. प्रत्येक हात दुसऱ्या खांद्याच्या सांध्याला स्पर्श करतो.कांही मिनिटे असे थांबून नंतर मूळ स्थितीला आला.(दाखविलेले चित्र अर्धे चुकीचे आहे. दोन्ही हात क्रॉस करून डोक्याखाली उशीसारखे हवे.)

ब्रह्माने आणखीही कांही आसने करून दाखविली. ज्याने मान, खांदे, डोके, पाठ ,पाय आणि हात यांना सुलभता येते रक्तप्रवाह छान होतो. मेंदूला शांती लाभते.
[ *सर्वांना सर्वच आसनांची आवश्यकता नसते. आणि आसने तज्ञाकडून शिकून करणे केंव्हाही उत्तम म्हणून सर्व दिलेली आसन वर्णने घेतलेली नाहीत.]*
मुख्यत्वे ब्रह्माने व्यायाम आणि योगासने यातील फरक सांगितला. व्यायाम बळकटी साठी असतो आसने तितिक्षा म्हणजे विशिष्ट अवस्थेत आवश्यक त्या काळापर्यंत राहण्याची क्षमता देते.

मांडी घालून बसण्याचे महत्व ब्रह्माने सांगितले. तसेच सरळ ताठ बसणे कसे आरोग्यदायी आहे हेही सांगितले. कोणत्याही योगाच्या स्थिती हळू हळू जमवीत जावे. सेकंदाने वाढवित शरीर लवचिक करावे. लहानपणी शरीर वाकविणे सोपे असते पण वय वाढत गेले की, कडकपणा मोडायला वेळ लागतो. एकदा जमू लागले की. प्रॅक्टिस सोडू नये. जर कांही सांधे कडक झाले तर तेल चोळून लवचिक होऊ शकतात. रोज प्रयत्न केल्याने सुयश मिळते. दुःख सहन करण्याचा अवधी वाढविणे जमले पाहिजे. हेच मुख्य गमक आहे. सुरवातीला दोन सेकंद ज्या स्थितीत राहता आले, त्यात हळूहळू प्रगती करण्यास चिकाटी हवी.

पाठ ६ **योगाने मरणावर मात** ८८

ब्रह्माने एकदा त्याच्या घरी नेले. जेथे चटईवर बसावे लागले. मला त्याने पुष्पहार घातला. मी त्याचा पहिला युरोपियन पाहुणा आणि मित्र या नात्याने. चहा बिस्किटे आली. छान स्वागत झाले.

ब्रह्मा सांगू लागला, एका दिवसात २१,६०० श्वास घेतले जातात.जर श्वास हळुवारपणे घेतले तर दिर्घायुष्याला उपयुक्त असतात. भराभर घेतलेले श्वास आयुष्य कमी करतात.
रक्त आणि श्वास यांचे नाते आहे. तसेच मन आणि श्वसनाचे आहे.

ब्रह्माने ७ सेकंदासाठी हृदयठोके बंद करून दाखविले.त्यावेळी तो दगडासारखा निश्चल होता. तो म्हणाला, माझे गुरु याहूनही प्रगत होते. ते आताच ४०० हून अधिक वयाचे आहेत.
तो म्हणाला, हिमालयातील वटवाघळे कांही आठवडे झोपी जातात.त्या कालात ते श्वास घेत नाहीत. असेच तेथील अस्वले हिवाळ्यात समाधी सारख्या अवस्थेत न खाता पिता, न श्वास घेता कित्येक दिवस असतात.

१८९७ मध्ये लाहोरला राजा रणजितसिंगच्या समोर एका फकीराला जिवंत गाडले त्या ठिकाणी पहारेकरी ठेवले गेले.४० दिवसानंतर त्याला बाहेर काढले. त्याची तब्येत उत्तम होती.

ब्रह्मा म्हणाला, मेंदूत एक बारीक छिद्र असते त्यात आत्मा राहतो. एक व्हॉल्व त्या छिद्राचे रक्षण करतो. पाठीच्या कण्याचे बुडाशी अदृश्य जीवन शक्ती असते. ही शक्ती प्रवाहाने क्षीण होते. त्यामुळे शरीर वृद्ध होते. योगी यावर विजय मिळवितो. तो जीवनशक्तीचे त्या छिद्रातील आत्म्याशी एकग्रीकरण करतो. त्या रक्षण कर्त्या व्हॉल्व्हला गुरूच्या मदतीने उघडतो आणि छिद्रात अमाप शक्ती वाहू लागते. हे सारे फार कठीण असते. ते अमृत सिंचन आयुष्य हवे तेवढा काळ जिवंत ठेऊ शकते. हवे तेंव्हा मृत्यू आणू शकते.
*
शेवटची सायंकाळ. ब्रह्माने मला देह नियंत्रणाची गुप्त रहस्ये सांगावी, या माझ्या विनंतीवर ब्रह्मा म्हणाला, जगातले सुख उपभोग सोडून पूर्ण वैराग्य अंगिकारण्याची तयारी असेल, तरच मी कांही सांगू शकेल.
मी स्तब्ध झालो. एखादे दिवसाची गोष्ट वेगळी, आणि नेहमी साठी सर्वसंग परीत्याग करणे हे माझ्या सारख्या संसारी माणसाला कसे जमेल ?

ब्रह्मा माझ्या मनीची घालमेल ओळखत म्हणाला, मन नियंत्रणात आणणे, देह नियंत्रणासाठी अगदी आवश्यक आहे. विचारांची शून्यावस्था, विषय निवृत्ती यांनीच मनोशुद्धी साधते. त्यामुळे देह नियंत्रण साधू लागते. आम्ही हे आदिनाथ शिवा कडून चालत आलेले ज्ञान मिळविले आहे.

मन निश्चल झाले की, अंतरी प्रकाश पसरतो. आत्मा जाणवू लागतो. अगदी भुकेल्या माणसाने अन्नाचा शोध घ्यावा, तशी तळमळ असेल, तरच सुयोग्य गुरूचा लाभ होतो. मग मार्ग सापडणे सोपे जाते. गुरुचे कार्यच अंधारातून प्रकाशाकडे नेणे आहे. नुसती पुस्तके हे करू शकत नाही.


ब्रह्माने कांही कागद माझेकडे दिले. त्यात न समजणारे बरेच कांही होते. वेगळाले रंग होते. सूर्य, चंद्र आणि माणसाचे डोळे चित्रित केले होते. मध्यभाग रिकामा होता.

मी हे सारे रात्री तयार केले. ब्रह्मा म्हणाला. माझा एक फोटो तू मध्यभागी लाव. रात्री झोपण्याआधी या विचित्र दिसणाऱ्या कागदातल्या चित्राकडे पहा. आपण कुठेही असलो तरी आत्मविचाराने एक होऊ.

दैवाने जे काम सोपविलं, ते पार पाडलचं पाहिजे. काल रात्री माझे गुरुजी येथे आले होते. त्यांनी तुला आवश्यक ते सर्व ज्ञान देण्यास सांगितले. ते म्हणाले, मागले जन्मी तू आमच्यातील एक होतास. पण आता सारे विसरला आहे. त्याला सांग, त्याचे गुरु लवकरच भेटतील.

मी म्हणालो पण तुमचे गुरुजी तर नेपाळला आहेत १२२० मैल एका रात्रीत त्यांनी कसे पार पडले? ब्रह्माने स्मित केले. तो म्हणाला.माझे गुरुजी नित्य माझे जवळ आहेत. त्यांचे संदेश मला येतच असतात. आमच्यात अंतर दुरावा करू शकत नाही.

आम्ही निरोपाचे वेळी बाहेर आलो. छान चांदणे पडले होते. ब्रह्माने त्याच्या बोटातील सोन्याची अंगठी बळजबरीने माझ्या बोटात घातली. माझ्याकडून एक लहानशी भेट ! ही अंगठी तुला दुर्मिळ संताच्या भेटी घडवील. तो म्हणाला. नंतर आम्ही एकमेकापासून वेगळे झालो



ब्रह्माने दिलेला जादुई चार्ट THE YOGI'S MAGIC CHART

पाठ ७ **कधीच न बोलणारा योगी** १०६

मद्रास शहराच्या बाहेर  राहतांना मी अनेकांशी संपर्क साधला. मद्रास पासून सुमारे अर्धा मैलावर एक अल्प प्रसिद्ध योग्याच्या बद्दल समजले. मी त्याला भेटण्याचे ठरविले.
तो उंच बांबूच्या वनात लपल्या जागी रहात असे. माझ्या एका मित्राने त्याचे निवासस्थान दुरून दाखविले. तो योगी सहसा ध्यानात मग्न असे. त्याच्या घराभोवती साधारण कंपाउंड होते. बांबूचे गेट होते. ते कुलुपबंद होते. आंत कसे जावे, याच्या विचारात आम्ही पडलो. कंपाउंड भोवती फिरतांना एका मुलाने

योग्याच्याकडे काम करणाऱ्या नोकराचे घर दाखविले. नोकराने आम्हाला योगी कुणाशीच बोलत नसल्याचे सांगितले. कुणाशी भेट घेणे टाळतो. आणि त्याच्या साधनेत कुणी व्यत्यय आणणे आवडत नाही.
आम्ही नोकराला पटविण्याचा प्रयत्न केला. पण तो कबुल होईना. कसेतरी लालूच, धाक दपटश्या अशा मार्गाने नोकराने दरवाजाचे कुलूप उघडून दिले.
दिवसभर साधनेत मग्न असलेला योगी संध्याकाळी काही फळे, मिठाई आणि दुध घेण्यासाठी फक्त आपली जागा सोडतो, असे नोकराने सांगितले. दगडी बांधकाम केलेल्या त्या कुटीत बाहेरून कुणी येऊन त्रास देऊ नये म्हणून फक्त नोकर आल्यावरच जाणे शक्य असे.

नोकराने आम्हाला काहीच आवाज न करण्याची ताकीद दिली. आंत सतरंजीवर योगी अगदी ताठ निश्चल दगडी पुतळ्यासारखा बसला होता. डाव्या पायाच्या घोट्यावर शरीर पेललेले. उजवा पाय त्यावरून अगदी पाठीकडे.

त्याची अंगकांती काळी पण सतेज आणि निरोगी, पिळदार होती. अंगावर फक्त लंगोटी, चेहरा देखणा, लांब खांद्यापर्यंत केस. काळीभोर दाढी, दोन्ही तळहात गुढग्यावर. ओठ विलग जणु आता हंसणार. नाक लहान सरळ. डोळे सताड उघडे. अगदी समोर अंतराळात रोखलेले. श्वसन अगदी हळुवार चाललेले.

कांही तास गेले.पण योग्याची हालचाल नाही. मी ठरविले होते, कितीका वेळ जाईना आज यांची मुलाखत घ्यायचीच. मी काही फोटो घेतले. नोकराने सांगितले, दोनेक दिवसांनी या, कांही उपयोग होईल.
आम्ही परतलो. त्याची माहिती इकडून तिकडून गोळा केली.

तो योगी आठ वर्षापूर्वी मद्रासला आला. कुठून आला, तो कोण वगैरे काहीच माहिती नाही. कुणाशीही बोलणे नाही. कधी नारळाच्या कवटीत थोडी भिक्षा मागे. ऋतू कोणताही असो, आसऱ्यासाठी त्यांनी निवारा शोधला नाही. लंगोटी विना इतर वस्त्रे परिधान केली नाहीत.

योगासाठी त्यांनी निवडलेले आसन नेहमी तेच असे. त्यांना त्रास देणारेही अनेक होते. कुणी वात्रट मुले दगड फेकीत कुणी माती किंवा चिखल उडवीत. पण त्यांची शांती कधीच भंग पावली नाही. कुणी अशांना शासन करू लागले तर तसे करू नका, कारण त्याचे परिणाम माझेवर होतात, असे लिहून देत. पण एके दिवशी नेहमी हुल्लड करणाऱ्या मुलांचे बद्दल कुणी पोलिसात कळविले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत योग्याने लिहून दिल्यावरून असे समजले की,

माझ्या गुरूच्या आदेशानुसार मी मद्रासला आलो. मी येथे राहावे, असे त्यांचे आदेश आहेत. येथेच मी साधना करतो. मला जगातील व्यवहार वर्ज्य आहेत. मला कुणाचीही मदत नको.

त्यांना एका धनिकाने चांगल्या घरात येण्याची विनंती केली. पण योग्याने नाकारले. मग त्या धनिकाने ही दगडी जागा बाधून दिली. तेथे त्रास देणाऱ्यांचे पासून सुटका झाली. त्याच व्यक्तीने एका नोकराची नियुक्ती केली. त्यामुळे भिक्षा मागणे बंद झाले. बहुदा योग्याच्या गुरूला हे आधीच ज्ञात असावे.
या योग्याचा एकही शिष्य नव्हता.

*

मी एका दिवशी दुभाषा आणि ब्रह्मा यासह त्यांचे कडे गेलो. ब्रह्माने नंतर मला सांगितले की, हा योगी गढवालच्या राणीचा भाऊ आहे. ब्रह्माने त्याच्या मदतीसाठी नेहमी काही मदत देण्याची इच्छा व्यक्त केली.

एकदा गढवालच्या दरबारातील एका महिलेचा मुलगा असाध्य व्याधीने ग्रस्त होता. या योग्याची कीर्ती ऐकून ती मद्रासला आली आणि योग्याचे आशीर्वादाने मुलगा बरा झाला. राणीला हे समजल्यावर ती दर्शनास गेली. तिने हा आपलाच भाऊ आहे हे ओळखून त्याला ६०० रुपये देऊ केले. ते नाकारून त्याने त्या कुटी भोवती बांबूचे कुंपण करण्यासाठी ते पैसे खर्च करावे असे लिहून दिले. त्यानुसार कंपाउंड व दरवाजा झाला.

आम्ही योग्याजवळ जमिनीवर अगदी शांत बसलो. एक तासाने योग्याची कांही हालचाल दिसून आली. डोळ्यांच्या पापण्या हलल्या. श्वास दीर्घ झाले. त्यांचे आवाज ऐकू येऊ लागले. डोळ्याची बुबुळे हालली. देहाची किंचित हालचाल झाली.

आमच्या येण्याची त्यांनी दखल घेतल्याचे जाणवले. पेन्सिल घेऊन वार्तालाप सुरु झाला. मी मागे येऊन गेल्याचे त्यांना माहित असल्याचे समजले. आणि काही फोटो घेतल्याचेही त्यांना ठाऊक असल्याचे समजले. मी क्षमा मागितली.

योग्याने लिहिले, मला कांही वाटले नाही पण पुन्हा कुणाही योग्याचे बाबतीत असे करू नकोस. त्याने त्यांना त्रास होतो. एकादे कुणी शाप सुद्धा देऊ शकतात.

मी माझी ओळख आणि उद्देश सांगितला व मला योग्य ते मार्गदर्शन करण्याची विनंती केली. दहा मिनिटे योगी निश्चल झाला. थोड्या वेळाने त्यांनी लिहिले, तू अजून स्वतःला ओळखले नाहीस, जगाला काय ओळखशील?
माझ्याकडे थेट नजर भिडवीत मला लिहिले, भुंग्यासारखा ज्ञान मिळविण्यासाठी कां फिरतोस? ते सारे तुझे जवळ खोलवर आहेच. स्वतःतच त्याचा शोध घे. विचारातील अज्ञान दूर झाले की लख्ख प्रकाशेल. अज्ञानात पुढे का जातोस. मागे फिर. प्रकाश लाभेल. ही विचारांची मागे फिरण्याची पद्धती योगात सर्व श्रेष्ठ आहे. यापुढचे ज्ञान तुला माझे गुरु देतील.

मी म्हणालो, जगात एवढे प्रश्न असतांना आपल्यासारख्यांनी असे स्वतःला एकाकी कां ठेवावे ?
मला उत्तर आले, जेथे तू स्वतःलाच ओळखले नाहीस माझे विषयी असा ग्रह कसा करतोस ? माझ्यात मध आहे असे भुंग्यांना फूल कळवीत नाही. ती प्रेरणा त्यांना सहजी होते. ज्यांना जी मदत मी देऊ शकतो, ती सहजी त्यांना त्यांच्या अध्यात्मिक क्षमतेनुसार माझ्यातून मिळणारच.

आतला शोध पुरता घे. अर्धवट सोडू नको. त्यांनी नंतर संवाद बंद करण्याचे सांगितले. शेवटचा संदेश दिला. माझेकडे आलास आनंद वाटला. यातून जे शिकलास, त्यातून पुढे जा. त्यांनी माझ्याकडे पहिले आणि मला एक शक्ती माझ्यात प्रवेशत असल्याचे स्पष्ट जाणवले. ती खालून पाठीच्या कण्यातून वर मस्तकापर्यंत चढत गेली.

योगी परत निश्चल झाले. जगातून निघून पुन्हा ध्यानात मग्न झाले.
आम्ही बाहेर गेल्यावर ब्रह्माने हे फार उच्च पातळीवरले योगी असल्याचे सांगितले. अर्थात अद्याप सर्वोच्च अवस्था गाठलेली नाही. पण एक गोष्ट निश्चित की, त्यांचे शरीर योगाने सुयोग्य बनले आहे आणि मनसुद्धा पूर्ण नियंत्रणात आहे.

मी पुन्हा त्या योग्याला भेटलो नाही आणि त्यांची शांती भंग केली नाही.

पाठ आठवा - **दक्षिण भारताच्या धर्मगुरूंच्या सहवासात** १३५.

मद्रासच्या रस्त्यावरून जातांना एक सुब्रमण्या नामक अनाहूत माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला विचारले, काही बोलायचे काय ? तो तोडक्या इंग्लिश मध्ये योगाबद्दल सांगू लागला. तो मला म्हणाला, तुम्ही आमच्या स्वामींना अवश्य भेटा. त्यांचे अध्यात्मातील ज्ञान सर्वोच्च आहे. तुमचे सारे अध्यात्म विषयक प्रश्न हमखास सुटतील. खरे तर त्यांनी बोलावले म्हणून तुम्ही येथे आलात. मला त्यांनी तुम्हाला हा निरोप देण्यास पाठविले आहे.

मला गंमत वाटली. मी विचारले, ते कोठे असतात. त्याने सांगितले, अरुणाचल या पर्वतावर. हे ठिकाण दूर दक्षिणेत आहे.मी त्याला सांगितले, माझा दौरा ठरला आहे. त्यांत आता बदल कठीण आहे.
तो म्हणाला, पण ही भेट फार महत्व पूर्ण आहे.

मी म्हणालो, पुढे कधी परत आलो, तर बघू. मी त्याला ठाम नकार देत, त्याला निरोपादाखल आभार मानले. तो म्हणाला, उद्या संध्याकाळी मी परत भेटेन. तोवर विचार करा.
मी खोलीवर परतलो. मिश्र विचारात झोपलो.

*

चहाच्या वेळी माझेकडे कुणी भेटायला आल्याचे समजले. तो एक लेखक होता. त्याची काही इंग्लिश पुस्तके प्रकाशित झाली होती. त्याचे नाव वेंकट रामाणी. तो मद्रास युनिव्हर्सिटीच्या सिनेटचा मेंबर होता.
तो माझ्या खोलीत आला. उंच ,सडपातळ, छोटे केस, डोळे मात्र गहिरे. कवी मनाची ओळख देणारे.
मी त्याला योग्यांची माहिती विचारली.
तो म्हणाला, योगी नसलेले एक महात्मा आहे. ते हिंदू धर्मगुरू आहेत. कुंभकोकणचे स्वामी शंकराचार्य. त्यांची अध्यात्मिक उंची फार मोठी आहे. ते सध्या चिंगलेपुट ला आहे. जे ३५ मैलावर आहे.
मला भेटू देतील कां? मी विचारले ? तो म्हणाला, प्रयत्न करू.
आम्ही जेवण आटोपून तिकडे निघालो. वाटेत मला त्यांची बरेच माहिती कळाली. त्यांच्या दैवी शक्ती, आशीर्वादाचे महत्व यामुळे त्यांचेकडे हजारो माणसे दर्शनाला येतात.

*

आम्ही पोचलो, तेंव्हा तेथे मोठी गर्दी होती. वेंकट रामाणीने सेक्रेटरी मार्फत भेटण्यासाठी निरोप पाठविला. थोड्या वेळाने आम्हाला नकार कळला. पण वेंकट रामाणीने मात्र पुन्हा प्रयत्न करायचे ठरविले. तो सरळ गर्दीतून पुढे घुसला. लोकांच्या टीका कडे लक्ष न देता तो गेला.आणि जरा वेळाने हंसत बाहेर आला. अपवाद म्हणून आम्हाला एक तासानंतरची भेटायची संधी मिळाली होती.



तो वेळ मी भोवती फिरण्यात घालविला. आमची वेळ होताच, आम्ही तिकडे गेलो. एका अरुंद प्रवेशद्वारातून आम्ही आंत शिरलो. बुटकेसे शंकराचार्य उभे होते. तेथे गेलो. नेलेली फळे वगैरेची भेट नम्रपणे दिली. नमस्कार केला.
मी शांतपणे त्यांच्याकडे पाहिले. भगवा पेहराव. सडपातळ अशक्त देह. ते चाळीशीच्या जवळपास होते. पण डोक्यावर केस मात्र करडे होते. अध्यात्मिक तेजाने उजळ उदात्त चेहरा. डोळे विशाल, काळे, तेजस्वी. लहानसे नाक, गंभीर मुद्रा. हनुवटीवर दाढी. मला पाहताच आदर वाटला.
१९०७ पासून अवघ्या १२ व्या वर्षी हे पद त्यांनी भूषविले.

मी भेट दिल्याबद्दल शंकराचार्यांची कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी माझ्या भारत भेटीतले अनुभव विचारले. मी थोडक्यात सांगितले.
मी जगाला चांगले दिवस कैंव्हा येतील? असे विचारले.
ते म्हणाले, जेंव्हा सैन्य आणि हत्यारे यावर भरपूर खर्च होतोय, तेंव्हा कल्याणकारी दिवस कसे येणार? गरीबी, श्रीमंती आणी राष्ट्रा-राष्ट्रातील दुरावा दूर व्हायला हवा. अध्यात्मिक दृष्टी यायला हवी. देवाला मानवा बद्दल प्रेम आहे. पण आपण भौतिकतेच्या नादी लागून मानवतेकडे दुर्लक्ष करीत आहोत.
ते पुढे म्हणाले, पण प्रत्येकात असलेली दिव्य शक्ती त्याला विचार करायला लावील. मग लोक अध्यात्मिक मुल्यांची कांस धरू लागतील.

मला भेटलेल्या योग्यांबद्दल त्यांनी विचारले. मी माहिती दिली. अद्याप हव्या त्या उंचीचे व्यक्तिमत्व सांपडले नाही असे सांगितले. त्यांनी दाढी कुरवाळली. ते म्हणाले,
या विविध भेटीत तुझ्या अंतरीचा प्रकाश उजळ होऊ लागला आहे. तो तुला योग्य मार्ग दाखवील.
मी काय करावे, याबद्दल विचारता ते म्हणाले, फिरती चालू ठेव. चिंतनही चालू ठेव. नंतर ज्याबद्दल विश्वास ठसेल त्याचे अनुसरण कर. त्यासाठी आंतला देव सहाय्य करील. ब्रह्म मुहूर्तावर त्याशी संधान साध.

मी विचारले मला गरज वाटली तर आपल्याला परत भेटू काय?
ते म्हणाले, माझे कार्य आणि दिशा वेगळी आहे. माझा वेळ पूर्णतया वाटला जातो. तीन तास झोपेखेरीज माझे जवळ वेळ नसतो.

मी त्यांना कुणी त्यांच्या माहितीतील, अद्ध्यात्म मार्गातील व्यक्ती आहेत तर सांगा, असे म्हणालो.
त्यांनी बनारसच्या एका व्यक्ती बद्दल सांगितले. पण युरोपियन असल्याने भेट कठीण सांगितले. दुसरी व्यक्ती महर्षी आहे. दूर दक्षिणेत आहे मी अद्याप भेटलेलो नाही. मात्र तो अत्युच्च स्तरावर आहे. त्यांना भेटल्याशिवाय दक्षिण भारत सोडू नकोस. आपण एकमेकाला विसरणार नाही. असे म्हणून संभाषण संपविले. त्यांचा निरोप घेतला. फार अविस्मरणीय भेट होती ती.
माझ्या मित्राने मला शंकराचार्यांना भेटलेला पहिला युरोपियन म्हणून नशीब वान म्हटले.
*
परत आलो, तेव्हा मध्यरात्र झाली होती. मी टॉर्च पेटवून खोलीत शिरलो आंत सुब्रह्मण्या वाट पाहत होता. मला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, मी आपणास परत भेटेन असे सांगितले होते.

मी विचारले तुमच्या गुरुंना महर्षी म्हणतात काय? त्याने होकारार्थी मान हालविली.
मी म्हणालो, ठीक. आपण उद्या त्यांचेकडे जाऊ. पण मी जास्त दिवस राहणार नाही. सुब्रह्मण्या आनंदला.

मध्येच अचानक मी उशी खालून घड्याळ पहिले. पावणे तीन वाजत होते. बाहेर मिट्ट काळोख. एकदम अनाहूत दडपण जाणवले. भोवती जणु वातावरण विद्युत प्रवाहाने भारले गेलेले. माझ्या पायाशी काहीतरी झगमगत होते. मी सरळ बसलो. समोर दिसले ते शंकराचार्य. मी डोळे चोळले. तो भास नव्हता. अगदी स्वच्छ स्पष्ट दर्शन. त्यांच्या चेहऱ्या भोवती तेज होते. मी अद्याप चिंगलेपुटला तर नाहीना ? मी डोळे मिटून पुन्हा उघडले. तेच दिव्य दृश्य.

हंसत ते म्हणाले, विनम्र हो. शोधतोस ते सांपडेल !
हलकेच ती आकृती आली, तशी विरळ झाली. मग उरल्या रात्री झोप लागेना.

पाठ ९ **पवित्र पर्वताकडे** १५२



मद्रास टर्मिनसहून आम्ही निघालो. भाताच्या शेताजवळून गाडी धावत होती. ब्रह्माने दिलेली सोन्याचीअंगठी मी घातली होती. आता मन एकदम स्वच्छ होते. कोणतेही पूर्वग्रह नसलेले. गोष्टी कशा घडत गेल्या. आणि मला ठरविलेल्या गोष्टींपासून वेगळे कसे करावे लागत गेले, हे स्मरून जीवन प्रवाहाचा ओघ कुणाच्या संकल्पाने वळणे घेतोय ते पाहून थक्क झालो. अनेक तासांच्या प्रवासानंतर आम्ही खाली उतरलो.

आम्ही पांडेचारीहून ४० मैल दूर होतो. नंतर छोट्या लाईनने आंत शिरलो. मला डुलकी लागली. माझ्या मित्राने जागे केले' एका लहानशा स्टेशनवर आम्ही उतरलो. अंधार कापीत गाडी निघून गेली. वेटिंग रूम मध्ये रॉकेलचा दिवा मंद प्रकाशत होता. उजाडू लागले. छोट्याशा खिडकीतून बाहेर दूरवर एक डोंगर आकाशाच्या पडद्यावर अस्पष्ट दिसत होता.

माझा मित्र बाहेर गेला. त्या वैराण एकांतात, एका बैल गाडीत कुणी झोपलेले होते. त्याच्या हाकेने तो जागा झाला. जणु तो आमचीच वाट पाहत होता. गाडीला बांबूच्या तट्यांच्या गोल कमानीने आडोसा केलेला होता. आमचा प्रवास त्या गाडीतून लाल मातीतल्या रस्त्यावरून सुरु झाला. माझ्यासारख्या युरोपीयनला रस्त्यातले शेतकरी, पाणी आणायला चाललेल्या मुली कुतूहलाने पाहत होत्या. त्यांच्या दृष्टीने मी अशा प्रवासात असणे अनोखेच होते.
आता एक बऱ्यापैकी गांव आले. एका देवळाभोवती काही आकर्षक घरे शोभून दिसत होती. प्रवेशद्वाराची भव्य वेस जुन्या स्थापत्याचे सौंदर्य जोपासित होती. खाली दगड आणि वर विटांच्या बांधकामाला स्वच्छ पांढऱ्या रंगाने रंगविलेले होते. देवाला भोवती चार उंच मनोरे शोभत होते. मला इजिप्तचे पिरामिड आठवले.

बैलगाडी पुढे गेली. आता सपाटी लागली होती. बहारदार निसर्ग मनाला आल्हाददायक अनुभूती देत होता. उगवत्या सूर्याच्या स्वागताची गाणी गात पक्षांचे मधुर संगीत श्रवणी पडत होते.
गाडी उतरणीला लागली. स्वच्छ सूर्य प्रकाश सुखावत होता. लाल धूळ आता स्पष्ट उडतांना दिसत होती. “अरुणाचल ! पवित्र लाल पर्वत ! ” माझा मित्र उद्गारला. पहा ‘अरुण ‘ आणि ‘ अचल ‘ म्हणजेच लाल पर्वत. पूर्ण पर्वत हा दैवी आविष्कार आहे. गाडी आता आश्रमाकडे जात होती. विस्तीर्ण खुल्या परिसरात गाडी थांबली. हात पाय ताणून मोकळे होत खाली उतरलो. वृक्षराजींनी वेढलेल्या सुरम्य परिसरात महर्षींचा आश्रम होता.
उतरत्या छपराच्या दोन छोट्याश्या वास्तू डावीकडे आणि बाजूला आधुनिक मोठी वास्तू. मध्यभागी एक मोठी विहीर. एक काळाशार नंगा छोकरा पाणी काढीत होता.
आमच्या चाहुलीने अंगावर अगदी आवश्यक विरळ कपडे घातलेले, कांही नवलाने पहात जमा झाले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य, आनंद आणि नवल होते. माझा मित्र तामिळ मध्ये बोलत गर्दीतून मला आंत नेत होता.

“आपण आता महर्षींच्या दिवाणखान्यात जाऊ ” तो म्हणाला. जोडे काढून आम्ही व्हरांड्यातून आंत शिरलो. माझ्याजवळील फळांची पिशवी काढीत मी जरा थांबलो. आणि दरवाजातून आंत शिरलो.

*

आंत दिवाण वर महर्षी शांत बसले होते.त्यांची नजर खिडकीच्या बाहेर शून्यात. डोके अगदी स्थिर. मी नम्रपणे फळे सादर केली. मागे सरकत स्थिरावलो.
वातावरणात छानसा सुगंध दरवळत होता. मी खाली बसलो. महर्षींच्या अंगावर एका लंगोटी खेरीज कांही नव्हते. अंगकांती ताम्रवर्णी. सतेज. मस्तकावर करडे केस. त्यांची अंगकाठी उंच वाटत होती. पन्नासच्या आसपास वय असावे. कपाळ उंच आणि रुंद. मला ते भारतीय पेक्षा अधिक युरोपियन वाटले.

भव्य दिवाणखान्यात निरव  शांतता होती. महर्षी अगदी निश्चल होते. आम्ही आलो, याने त्यांच्या शांतीत कांहीच फरक पडला नव्हता. एक कृष्णवर्णी शिष्य दिवाणाच्या बाजूला बसला. तो महर्षींना वारा घालू लागला. लाकडी फ्रेम मध्ये बसविलेला पंखा छताला लावलेला होता आणि त्याची दोरी खालपर्यंत आली होती. त्याच्या फिरण्याने सुरेख लयबद्ध नाद ऐकू येऊ लागला. महर्षींच्या गहिऱ्या तपकिरी डोळ्यांकडे मी एकटक पहात होतो.

त्यांचा देह जणु एकाद्या शिल्पासारखा निश्चल होता.लोहचुंबकाने लोखंडाला खेचावे तसे मला या व्यक्तिमत्वाने खिळवून ठेवले होते. मी त्यांच्या खेरीज इतरत्र लक्ष देऊच शकत नव्हतो. त्यांच्या विषयीचे आकर्षण विलक्षण होते.

माझ्या कांही प्रश्नाची निरर्थकता मला सहजी जाणवत गेली. अध्यात्माच्या अनंत, उदात्ततेपुढे माझे प्रश्न अगदी खुजे वाटत होते. अगदी सहज मनात योजिलेल्या प्रश्नांची यादी हलकेच कमी होत चालली. एकाद्या शांत प्रवाहात मी जणु सामावला गेलो होतो. त्या शांतीची अनुभूती मलाही स्वच्छ जाणवत होती.
त्या नीरव प्रसन्न शांततेत पूर्णपणे समरस होऊन दोन तास कसे गेले समजलेही नाही. काळाच्या मोजमापाचे भान मनाला उरलेच नव्हते.एकाद्या फुलांतून जसा सुगंध सहजी दरवळावा तसे या महर्षीतून शांतीच्या लहरी वातावरणाला व्यापून टाकीत होत्या. माझ्या मनीची खळबळ महर्षींच्या सहवासाने सहजी शांत होत होती, जरी अद्याप त्यांनी मला पुरते पाहिलेही नव्हते.

कुणीतरी येऊन माझ्या कानाशी पुटपुटले, कांही विचारायचे कां महर्षींना? मला मनापासून त्या शांतीचा स्वतः भंग करावासे वाटेना.
महर्षींनी हलकेच मान हालविली. त्यांची नजर आजूबाजूला जाऊ लागली. त्या नजरेच्या शांत स्पर्शात मी सामावलो गेलो. पण मला कांहीच विचारावेसे वाटेना.

*

दुपारची जेवणे झाली. उष्मा वाढू लागला. मी शांतपणे दिवाणखान्यात गेलो. महर्षींच्या दिवाणापाशी जाऊन बसलो. कुणी पंख्याची दोरी ओढणे चालू केले. हवेतला उष्मा कमी वाटू लागला.

महर्षींचा हाती एक हस्तलिखित होते. ते कांहीतरी शांतपणे लिहित होते. थोड्या वेळाने त्यांनी ते बाजूला ठेवले. शिष्याला बोलाविले. तामिळ मध्ये कांही बोलणे झाले. मला शिष्याने सांगतले की, येथे जेवण अगदी साधे असते. तुम्हाला गैरसोय झाली असेल, तर महर्षींना खेद वाटतो. यावर मी आदरपूर्वक मला जेवणाहूनही महर्षींचा सहवास महत्वाचा वाटतो असे सांगितले.

मी सांगू लागलो, मी पश्चिमेच्या वातावरणात वाढलो आहे. तत्वज्ञानाच्या अनेकविध चर्चा ऐकून गोंधळून गेलो आहे. मी भौतिक अनुभवाच्या पलीकडल्या प्रत्यक्ष अनुभूतीचा भुकेला आहे. आपण या बाबतीत मला कांही मदत करू शकाल काय?
महर्षींनी शांतपणे इंग्रजीत मला विचारले, हा ‘ मी’ कोण ?

इतके साधे उत्तर माझ्याकडून महर्षी कां मागत आहेत. मी म्हणालो, आपला प्रश्न नीट कळला नाही.
महर्षी म्हणाले, अगदी सरळ प्रश्न आहे. शांतपणे विचार कर, आणि उत्तर दे.

मी गोंधळून गेलो. आणि माझ्याकडे बोट करून म्हणालो, मी पॉल ब्रन्टन
“ तू ओळखतोस त्याला ” महर्षी.
मी हंसत म्हणालो, आयुष्यभर.

महर्षी म्हणाले तू शरीर दाखविलेस. तू कोण ?
मला उत्तर सुचेना.
महर्षी पुढे सांगू लागले, आधी या ‘मी’ चा शोध घे. आणि तुला खरे सत्य समजेल.
माझे मन अस्वस्थ झाले.

महर्षींनी शिष्यामार्फत मला सांगितले, एक गोष्ट कर. स्वतःच्या आंत बघ. नीट शांतपणे शोध घे.तुला या प्रश्नाचे उत्तर मिळेल. इतर प्रश्नही सहजी सुटतील.
मी विचारले, याची कांही पद्धती आहे काय?
महर्षी- पद्धत एकच. खोल शोध घे. स्वतःची घडण नेमकी कशी आहे, ते पहा. स्वतःवर नीट लक्ष ठेव. आणि प्रकाश येईल. हे तुला स्वतःच करावे लागेल. मी फक्त दिशा दाखविली. जितका तुझा शोध प्रामाणिक असेल तितके लवकर याचे उत्तर मिळेल. फटाका लवकर पेटतो. ओल्या लाकडाला पेटायला परिश्रम पडतात.

मी आणखी विचारले, या जगात समाधान, शांती कशी व केंव्हा नांदेल ?
महर्षी उत्तरले, या जगाचा मालक ठरवील, तसे होईल. त्याला आपल्या पेक्षा जास्त समजते. जसे आपण तसेच आपले जग असते. स्वतःला ओळखल्या शिवाय जगाची ओळख पटत नाही. बाहेर पाहण्यापेक्षा आंत पाहावे. आयुष्य बाहेर पाहून व्यर्थ घालवू नये. तुही या जगाचा एक भाग आहेस.
महर्षींनी पुन्हा हस्तलिखित उचलून लिहिणे चालू केले. याचा अर्थ उमगून मी शांत बसलो. थोड्या वेळाने नमस्कार करून तेथून निघालो.

*

मी अरुणाचलाचे मंदिरात गेलो. हे फार प्राचीन मंदिर आहे. त्यातील शिल्पकला अप्रतिम होती.

*

पुन्हा आश्रमात गेल्यावर महर्षी एका कोपऱ्यात एका कोचवर शांत बसलेले पाहिले. मांडी घातलेली. दोन्ही हात गुडघ्यावर अगदी साधेपणा, धीरगंभीर, सहजी छाप पडणारे व्यक्तिमत्व. मस्तक सरळ. डोळे पर्वताच्या दिशेने अंतराळात.
मी एकाजागी स्थिरावलो. नजर महर्षींच्या नजरेशी जुळविली.पण माझ्या पापण्या जड झाल्या. मिटू पहात होत्या. थोड्या वेळात मी अर्धवट झोपेत गेलो. शांत वाटू लागले. महर्षींचा सहवास विशेषत्वाने जाणवू लागला. स्वप्नवत अवस्थेत मी पाच वर्षाचा बालक होतो. अरुणाचलाच्या खडबडीत रस्त्यावर उभा होतो.

माझा हात महर्षींच्या हातांत होता. त्यांची शरीर यष्टी अगदी उंच भव्य अशी वाटत होती. भोवती दाट काळोख. आम्ही हळू जपून चालत होतो.

हळूच चांदण्यांच्या मंद प्रकाशाने रस्ता दिसू लागला. महर्षी मला रस्त्यावरल्या दगड गोट्यातून काळजी पूर्वक नेत होते. डोंगराची चढण अगदी कठीण होती. हळू चालणे आवश्यक होते. डोंगराच्या लपल्या भागात एकाजागी झाडझुडूपांनी झांकलेल्या गुहा दिसल्या. अनेक योगी आम्हाला वाटेत दिसले. ते महर्षींचे स्वागत करीत होते. आम्ही न थांबता पुढे जातच होतो. डोंगराच्या शिखराशी पोचलो.

महर्षी माझ्याकडे वळून त्यांनी माझ्या चेहऱ्याकडे पाहिले. मीही त्यांच्या नजरेला नजर भिडविली. माझ्या अंतरी अगदी झपाट्याने प्रचंड खळबळ उठत होती. माझ्या मनीच्या शंका, इच्छा, आकांक्षा, आसक्ती, अज्ञान, स्वार्थ, आवड नावड सारे सारे विरघळून गेले. मला शून्यवत वाटू लागले. विशिष्ट अस्तित्व उरले नाही. नीरव शांतीने मी सुखावलो होतो किंबहुना मीच ते होतो. जीवनात सारे काही पूर्णपणे मिळाल्याची पूर्णत्व भावना अनुभवली.

महर्षींनी अचानक मला पर्वताचे खाली नजर टाकण्यास सांगीतले. मला पश्चिमेचा अर्धगोल दिसू लागला. लाखो लोक तेथे होते. पण ते सारे काळोखात चाचपडत होते.
महर्षी शांतपणे मला म्हणाले,  तू परत जाशील, तेंव्हा ही अशीच शांती अनुभवशील. पण त्यासाठी तुला एक किंमत द्यावी लागेल. ती म्हणजे, तुझे वेगळेपण विसरावे लागेल. हा देह, मन, बुद्धी मेंदू काहीच तू नसून तूच ते नित्य अस्तित्व आहेस !

नंतर महर्षींनी एका चंदेरी किरणांच्या धाग्याचे एक टोक माझे हाती दिले.
मी अचानक त्या विचित्र स्वप्नातून जागा झालो. त्यातील सारे तपशील अगदी स्वच्छ आठवत होते जणु ती एक घडलेली घटना होती. आणि महर्षींनी त्यांची नजर माझे नजरेत मिळविली. अगदी एकटक माझेकडे ते पहात होते.

माझ्या स्वप्नाचा उद्देश काय? त्यांत माझेकडून अपेक्षा केलेल्या विरक्त जीवनाचे प्रत्यक्षात अनुसरण मी करू शकेन काय? माझ्या सध्याच्या भौतिक अस्तित्वाशी पूर्णतया विरुद्ध पूर्णकाम, विरक्त असे जीवन अनुसरणे हेच माझे जीवन उद्दिष्ट आहे काय?
त्या स्वप्नाच्या अनुभूतीने माझा पाठपुरावा केला. इतर सगळे उठून झोपायच्या उद्देशाने जाऊ लागले. मीही तसेच करावे काय?

मी व्हरांड्यात झोपायचे ठरविले. मला एक कंदील तेवता ठेवायला सांगण्यात आले, कारण रात्री सर्प किंवा चित्ता पाहुणा म्हणून यायला नको. जमीन कडक होती माझेजवळ गादी नव्हती. झोप येणे, तसेही शक्यच नव्हते. महर्षींचा माझ्या अंतरंगीचा प्रवेश मला विचारांच्या फेऱ्यातून सोडीत नव्हता.

ते स्वप्न माझ्या स्मृतीत ठाण देऊन बसले होते. माझे महर्षींशी निश्चित अध्यात्मिक नाते असण्याचे प्रकर्षाने वाटत होते. पण ते नेमके कोणत्या प्रकारचे आणि माझ्या जीवनाशी कसे निगडीत आहे त्याचा खुलासा होत नव्हता.

*

पुढील दिवसांत मी महर्षींच्या अधिकाधिक जवळ जाण्याच्या प्रयत्नात होत्यो. पण व्यर्थ ! याची करणे तीन; पहिले, महर्षींचा अलिप्त राहण्याचा स्वभाव. चर्चा व वाद यापासून दूर राहण्याची वृत्ती. इतरांच्या श्रद्धांना न दुखावण्याची  प्रवृत्ती. आणि आपल्याच म्हणण्याला रुकार द्यावा अगर आपला अनुयायी व्हावा, अशी अजिबात इच्छा नसण्याचा स्वभाव.
दुसरे, कारण जरा विलक्षण, पण निश्चितीने संयुक्तिक असलेले; ते म्हणजे त्या विलक्षण स्वप्नानंतर मला महर्षींच्या बद्दल दर भेटीच्या वेळी मनात दाटलेली वडिलकीच्या नात्याची आदर भावयुक्त भीति. त्यांच्या उच्च स्थानाहून माझे गौण वाटणारे स्थान मला सहजी प्रश्न विचारण्यापासून मागे खेची.
तिसरे, इतरांच्या प्रश्नात आपली वैयक्तिक प्रश्नांबद्दलची लुडबुड मलाच नकोशी वाटे. तसाही मी परदेशी. त्यांच्या वातावरणात नवखा. माझी भाषेची अडचण, दुभाषाची मदत. आणि महत्वाचे म्हणजे महर्षींच्या महानतेला बाधा येणारे कांही विचारले गेले तर पंचाईत.

या सर्व कारणांनी माझे प्रश्न मनातच थबकले. माझे जाणे त्यामुळे लांबणीवर पडत गेले. माझ्या जाण्याचा दिवस येऊन ठेपला. तरीही माझे अंतर कायम राहिले. मला ते असामान्य वाटतं. खूप उंचीवरले जाणवतं. ते निसर्गाच्या लयीशी आपली लय जुळवून असतं.

गेले ३० वर्षे ते याच पर्वतावर राहिले. अगदी जवळच्या यात्रा वा प्रवास या काळांत घडला नाही.  त्यांना या पर्वताविषयी प्रेम वाटे. साऱ्या चिंता, काळज्या, प्रश्न यापलीकडे ते पोचले होते. शेवटी मी त्यांच्या जवळच्या शिष्याला गाठले. त्याला माझी एक भेट घडवून देण्याची विनंती केली. त्याने निरोप आणला महर्षी आताच तयार आहेत.

मी ताबडतोब हॉलमध्ये गेलो. दिवाणाजवळ बसलो. महर्षींनी  माझेकडे वळून  हास्य केले.
मी म्हणालो, असे म्हणतात की, योगी होण्यास पुरते वैराग्य, संसार त्याग आवश्यक असतो.
मग एकांतात जंगलात जाऊन साधना केली पाहिजे. असे आमच्या पश्चिमेकडे कसे जमेल ?  आपले यावर काय म्हणणे आहे ?

महर्षी- आपली नियमित कामे चालू ठेऊन मनावर लक्ष ठेवण्याची संवय ठेवली, तर असा त्याग आवश्यक नाही. जीवनातील आवश्यक कार्ये सोडून कसे चालेल ? असे सतत साक्षी भावाने स्व निरीक्षण केले तर आपली इतरांकडे पहाण्याची दृष्टी बदलू लागते. अंतरी शुद्धी येते. माणसाने त्याचा स्वार्थ सोडणे आवश्यक आहे. तोच बंधनास कारण आहे. देहभाव त्याग सर्वात आवश्यक आहे. आपण कोणतेही काम करीत असतांना सुद्धा साक्षी भावाने शरीर व मन काय करते, हेच नित्य ध्यान. त्यासाठी वेगळा वेळ काढणे फक्त त्यांचेसाठी आहे, ज्यांना हे जमत नाही. अशांनी रोज एक किंवा २ तास काढावे. जसजशी अंतर्शुद्धी होत जाईल, तसतसे त्यात आनंद वाढत जातो.

मी- यासाठी काय करावे?
महर्षी- स्वतःला विचारावे, मी कोण आहे? शोध घ्यावा. मनाच्या पलीकडे जे निर्मळ अस्तित्व आहे त्याचा बोध याने होतो. एकदा हा प्रश्न सुटला की, जीवनात कोणताही प्रश्न उरत नाही. आनंदाची प्राप्ती हे प्रत्येकाच्या अंगीकृत कार्याचे उदिष्ट असते. पण कांही बाह्योपाचाराने तो मिळेल हा भ्रम आहे. काहींना दुसऱ्याला त्रास देण्यात, पाप करण्यात आनंद वाटतो. काही खाणे पिणे ,इतर भोग यामागे लागतात. पण जर अंतरीचा  आनंद गवसला तर तो कदापि संपत नाही.
स्वतः विषयीचे अज्ञान हेच दुःखाचे कारण आहे. महर्षी अगदी हृदयाच्या तळापासून बोलत होते. पांडित्य,

तत्वज्ञान यांचा बोजड पणा त्यांच्या बोलण्यात नव्हता. ते प्रचितीचे बोलणे होते. वाक्ये सोपी होती पण अर्थ गहन होता.

मी- आपण सांगता तो स्व या स्व हून वेगळा आहे म्हणजे दोन स्व आहेत काय?
महर्षी- (स्मित करून) एकच अस्तित्व दोन कसे असू शकेल ? स्वच्छ निरीक्षणाने आपल्यातील अशुद्धी गळू लागते. सहजी आपली खरी ओळख पटते. मात्र हा शोध वरवरचा नको. खोल शोध घ्यावा लागतो. देहाशी इतके तादात्म्य झालेले असते की, खरा स्व उपेक्षित राहतो.

मी- मग आपले भौतिक वेगळेपण विसरले जाईल. जीवनाच्या प्रवाहाचे काय?
महर्षी- अगदी तळाशी लपलेला हा स्व जाणीवेचा विस्तार करतो. आपले सारे व्यवहार अलिप्तपणे चालू राहतात. आपण नित्य मुक्त असतो. आपले दैवी, शाश्वत, चिरंजीव, अस्तित्व जाणवणे यालाच हिंदू मुक्ती, बौद्ध निर्वाण, कुणी स्वर्गीचे राज्य, अशा वेगवेगळया नावाने ओळखले जाते.

मला गॅलीच्या ओळी आठवल्या, *“Whosoever shall seek to save his life shall lose it; and whosoever shall lose his life shall preserve it ”*

महर्षी पुन्हा सांगू लागले, जोपर्यंत आपण आपला खरा शोध घेत नाही, तोवर शंका, अनिश्चिती, प्रत्येक पावलोपावली येत राहतील. आपले देह साम्राज्य आपणच नीट नियंत्रित करणे आवश्यक आहे. अंतरी प्रचंड शक्ती स्रोत आहे.

आपण सारे जाणून घेण्याचा प्रयास करतो पण खरा शोध न घेतल्याने जीवन व्यर्थ जाते. आपल्या प्रत्येक क्षणी आपण हा शोध चालू ठेवावा. मग भौतिक आणि अध्यात्मिक वेगळे होत नाही. नित्य आनंदाचा ओघ जीवनात सुखावह होतो.
मला माझ्या येथे येण्याचे खरे सार्थक वाटले. महर्षी पुन्हा दूर अंतराळात पाहू लागले.

*

मी तेथून निघालो सरळ जंगलात गेलो. माझे लेखन आणि चितन यांत वेळ कसा गेला हे कळलेच नाही. संध्याकाळी बैलगाडी येणार, तोवर मी परत आलो.

महर्षी उजवा पाय डाव्या मांडीवर आणि डावा पाय उजव्या खाली अशा आरामदायी आसनात होते. ब्रह्मा याला सुखासन म्हणे. महर्षी अगदी मी आलो तेव्हा ज्या स्थितीत पहिले त्याच ध्यानमग्न अवस्थेत आता पहिले. वातावरणात दिव्य शक्तीचा अनुभव येत होता.

त्यांच्या डोळ्यातले दिव्य तेज सुखावत होते. त्यांच्या दृष्टीक्षेपाने माझ्या अंतरीचे विचार भेदून खोल गेले. जणु त्यांची शिकवण सहजी माझ्या मनात स्थिरावली. काळ स्थिरावला. मला अगदी हलके वाटू लागले. विशेष म्हणजे, एकेक जण उठून जात जात हॉल मध्ये फक्त मी आणि महर्षीच उरलो. असे कधी घडले नव्हते.
महर्षींचे डोळे मिटू लागले. माझे मी पण हरवले. एकाएकी आम्ही दोघे जणु हवेत तरंगू लागलो.
हळूच मी पूर्वपदावर परतलो. परम शांतीत गढून गेलेले त्यांचे नम्रभावे दिव्य दर्शन घेउन मी निघालो.

जातांना मी आभाराचे शब्द पुटपुटलो. उंबरठ्यावरून पाऊल निघेना. बाहेर बैलगाडीचा आवाज निनादला. मी नमस्कारासाठी हात जोडले आणि प्रस्थान केले.


पाठ १० **जादुगार आणि संतांच्या सहवासात.**

मद्रासमध्ये मला अनेक योगी म्हणवून घेणारे, पण हातचलाखीने चमत्कार दाखविणारे अनेक जादुगार भेटले.

मी नंतर कलकत्ता येथे गेलो. गाडीत एकजण *Life of Ramakrishna,* वाचीत होता. मी विनंती करून ते पुस्तक उत्सुकतेने चाळले. ज्याच्याकडे ते पुस्तक होते; तो रामकृष्णांच्या शिष्यांना चांगलेच ओळखत होता. त्यापैकी एक त्याचे गुरु होते. त्यांचे नांव स्वामी[मास्टर] महाशय. मी त्यांचेबद्दल त्याचे कडून माहिती घेतली.

तुमचा उद्देश समजला की, भेटीसाठी वेगळी ओळख लागणार नाही, असे त्याने सांगितले.

मी महाशयांचे निवासस्थान शोधले. वरच्या मजल्यावर स्वामी महाशय रहात होते. छोट्याशा खोलीत मी आलो. तेथे मला एका तरुणाने स्वामींना बोलावतो. येथे थांबा,असे सांगितले.



स्वामी महाशय

दहा मिनिटे गेली. कुणीतरी खालच्या मजल्यावरून माझ्या विचारांचे निरीक्षण करीत आहे असे जाणवले. जिन्यावर मंदगती पाउले वाजली. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. ते खोलीत आले.

डोक्याला टक्कल, लांब पांढरी दाढी, पांढऱ्या मिशा, आकर्षक डोळे, ऐशी वर्षांच्या काळ प्रवाहाने किंचित झुकलेले खांदे. हेच ते स्वामी महाशय. त्यांनी दिवाणावर आसन ग्रहण केले. पाहताच जाणवणारे आदरणीय व्यक्तिमत्व. माझे मन निःशंक झाले. त्यांच्या अस्तित्वात दिव्यतेचा आणि ईश्वरी अपार कृपेचा आविष्कार प्रत्यक्ष अनुभूत होत होता.

ते माझ्याकडे वळून बसले. ठसठशीत इंग्रजीत मला म्हणाले, सुस्वागतम. मला दिवाणावरच त्यांच्या शेजारी बसण्याची खूण केली. त्यांनी माझा हात काही वेळ हाती धरला. मी बोलण्यासाठी मनात शब्द जुळवीत होतो, त्याच वेळी त्यांनी पुन्हा माझा हात प्रेमाने दाबला.

ते ,म्हणाले; त्या उच्च शक्तीने तुला भारतात येण्याची प्रेरणा दिली. आणि तिच्या कृपेनेच या भूमीतील थोर पुरुषांशी तुझा सत्संग होत आहे. जरा थांब. यामागचा उद्देश लवकरच उघड होईल.

मला स्वामी रामकृष्णांच्या बद्दल काही सांगाल काय?- मी.

या पृच्छेने महाशयांची कळी खुलली, ते म्हणाले, माझ्या अतिप्रिय विषयावर तू विचारणा केलीस. सुमारे अर्ध शतकापूर्वी स्वामींनी इहलोक सोडला. पण त्यांची कृपामय स्मृती हृदयात नित्य ताजी दरवळत आहे.

मी २७ वर्षांचा होतो, तेंव्हापासून पांच वर्षे मी त्यांच्या नित्य सहवासात होतो. त्यामुळे माझे व्यक्तिमत्व पूर्णतया बदलून गेले. ते एक दैवी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या सत्संगाने जीवनाकडे पाहण्याची माझी दृष्टी पार बदलून गेली.

प्रपंचात पूर्ण गढलेले सुद्धा त्यांच्या सहवासात विरागी बनले. जे जे त्यांच्या सहवासात आले ते सारे अध्यात्माच्या वाटेवरले प्रवासी झाले.

संसारात आसक्ती असणाऱ्या व्यक्तींना अध्यात्माची गोडी कशी लागली?- मी.

महाशय हंसले, ते म्हणाले, दोन व्यक्ती लाल मिऱ्यांची पहिल्यांदाच चव घेतात. एकाने यापूर्वी कधी हा पदार्थ पाहिलाच नव्हता. दुसऱ्याला त्याची सगळी माहिती आहे. दोघांना झणझणीत चव तर एकच लागेल ना? अगदी तसचं अध्यात्माची चव अनुभवण्यापासून स्वामींनी कधीच कुणालाही मज्जाव केला नाही. मग तर त्यांना अध्यात्मातील महामानव म्हणायला पाहिजे. - मी.

महाशय उत्तरले, अगदी बरोब्बर ! विशेष म्हणजे ते अगदी साधे होते.राहणी सुद्धा अगदी साधी होती. अशिक्षित आणि तसे अडाणीच होते. त्यांना स्वतःचे नांवही लिहिता येत नव्हते. नित्य नम्रता हा त्यांचा सहजभाव होता. पण भल्या भल्या सुसंस्कृत आणि बहुशिक्षीत पंडितांना त्यांचेविषयी आदरभाव होता. त्यांच्यातील महान अध्यात्मभाव त्यांच्या सहवासात सहजी जाणवे.

ते आम्हाला गर्व, ताठा, श्रीमंतीची मिजास, सन्मान, सत्ता हे अध्यात्माच्या पुढे अगदी नगण्य असल्याचे शिकवित. काय सुखाचे आणि विस्मयकारक  दिवस होते ते ! त्यांच्या सत्संगातील प्रत्येकाला त्यांच्यातील दैवी अस्तित्व सहजी अनुभूत होई. ते माणूस म्हणून कुणाला वाटलेच नाही. त्यांच्या स्पर्शानेही कित्येकाना दिव्य अनुभूती यायची. माझ्यात त्यांचे मुळे झालेला बदल कसा झाला ते जरा ऐक.

महाशय सांगू लागले; मी तसा पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीत शिकलेला. ज्ञानाच्या गर्वाने माझ्या मस्तकात चांगलीच हवा भरलेली असे. इंग्लिश भाषा. इतिहास आणि राजकीय अर्थशास्त्र यांचा प्राध्यापक म्हणून कलकत्ता कॉलेजमध्ये मी नोकरी केली होती.

रामकृष्ण कलकत्या जवळच काही थोड्या मैलावरील नदीपलीकडल्या दक्षिणेश्वर मंदिरात राहायचे. एका वसंत ऋतूतील अविस्मरणीय दिवशी मी त्यांना तेथे पहिले. त्यांच्या स्वानुभवाने आलेल्या अध्यात्माच्या काही साध्या शब्दातील उस्फुर्त विचारांनी मी भारलो गेलो. त्यांच्याशी बौद्धिक वाद घालण्यासाठी ओठाशी आलेले माझे अस्पष्ट विचार त्या पावन परिसरात, कसे कोण जाणे, जिभेवरच विरून गेले. त्यांच्या दैवी अस्तित्वाचा गहिरा प्रभाव शब्दापलीकडला होता.

मी सहजी पुनःपुन्हा त्या साध्या, निष्कांचन, विनम्र दैवी अस्तित्वाकडे येत राहिलो. एकदा रामकृष्ण विनोदाने म्हणाले; एका मोराला अफूचा डोस चार वाजेला दिला. दुसऱ्या दिवशी तो चटावून नेमका त्याच वेळेला आला. दुसऱ्या डोसाच्या लोभाने !

एका अर्थाने त्यांचे विधान बरोबर होते. मी या आधी अशी रामकृष्णांच्या सत्संगाची कल्याणकारी अनुभूती घेतलीच नव्हती. हळूहळू मी त्यांच्या जवळच्या अनुयायातील एक झालो.

एक दिवस स्वामी म्हणाले, तुझ्या डोळ्याशी मला काही खुणा दिसताहेत. चेहरा आणि भिवया वरून योगी ओळखू येतो. एक लक्षात ठेव तुझ्या वाट्याला आलेली सारी कामे करीत रहा. पण मन भगवंता जवळच असू दे. बायको, मुले, आई वडील यांचे बरोबर रहा त्यांची कर्तव्ये कर, अगदी मनोभावे.

कासविण दूर पाण्यात पोहत असते; पण लक्ष सारे तिच्या दूरवरच्या किनाऱ्यावरील वाळूतील अंड्यापाशी असते. तसंच तुझं लक्ष केवळ एका भगवंताखेरीज दुसरीकडे कदापि  नसू दे !

मी माझी विद्याक्षेत्रातील सेवा चालूच ठेवली आणि स्वामींचा उपदेश आचरणात आणला .त्याचा प्रसारही केला. कांही रात्री मी जेथे भिकारी झोपतात त्या धर्मशाळेच्या मोकळ्या व्हरांड्यात सुद्धा झोपे.

महाशय म्हणाले. प्रार्थनेत फार शक्ती असते. जेव्हा आपले प्रयास कमी पडतात, तेंव्हा सरळ प्रार्थनेने देवाला गाऱ्हाणे सांगावे. तो अंतिम पण जालीम उपाय आहे. सत्संगही फायदेशीर आहे. त्याने अनायासे बळ लाभते.

स्वामी महाशयांनी अनेक प्रवचने देऊन सामान्यांना सन्मार्गाला लावले.

पाठ अकरा - **बनारसचे चमत्कार कर्ते**

विशुद्धानंद नामक चमत्कार करणारे योगी काशीत रहात मी त्यांचेकडे एक दुभाषा घेऊन गेलो. विशुद्धानंद दिसताच त्यांना नमस्कार केला. त्यांनी जवळ बसण्यास सांगितले.

त्यांनी माझा हातरुमाल घेतला. आणि म्हणाले, तुला हवा तो सुगंध यातून येईल. त्यासाठी हवे एक भिंग आणि सूर्य प्रकाश. सूर्यकिरणे भिंगातून रुमालावर पडून त्यांनी माझे जवळ रुमाल दिला. मी जे नांव सांगे, तो सुगंध येई मात्र रुमालात कोठेही आर्द्रता नसे.

त्यांनी तिबेटमध्येच फुलणाऱ्या फुलाचा अज्ञेय सुगंध देवविला.  ते म्हणाले हे योगाचे शास्त्र नसून सूर्यकिरणांचे रहस्यमय शास्त्र आहे. तिबेटमध्ये या शास्त्राचे जास्त ज्ञाते आहेत.

पाठ बारा **ग्रहांचे लेखन**

यात बनारसच्या जोतिषी सुधाय बाबू यांच्या भविष्य कथना बद्दलचे अनुभव आहेत.

पाठ तेरा **देवाचे उद्यान**

आग्रा येथील दयाळ बाग[देवाचे उद्यान] मध्ये राधा सामी सत्संग नामक संस्था आहे. त्यांचे मुख्य साहबजी महाराज होते. त्यांची भेट झाली.

ते म्हणाले, देवाचे अस्तित्व म्हणजे प्रेम आणि सौंदर्य.

माणूस ज्या गोष्टी नित्य वापरतो त्याचे गुण अवगुण त्या वस्तुत उतरतात. माणसाच्या भावना त्या त्या वापरलेल्या वस्तूत उतरतात. अगदी विचारांचा पगडा सुद्धा त्यात उतरतो.

ते म्हणाले ही केवळ थिअरी नाही तर वास्तव आहे. आपल्या सूक्ष्म देहाचे हे परिणाम असतात.

त्यांची संस्था अनेक उपयोगी गोष्टींची निर्मिती, मुलांची शिक्षणे, जनजागृती इ, कार्ये करते.

पाठ १४ वा **पुन्हा मेहेरबाबा पारसी देवदूत**

आग्रा ते नाशिक हा लांबचा प्रवास करून मी पूर्वी कबूल केल्याप्रमाणे अवतार मेहेरबाबा यांना भेटण्यास गेलो. मात्र मला आतला आवाज अगदी प्रकर्षाने सांगत होता की, ही भेट, निव्वळ वेळेचा अपव्यय होईल. हा माणूस चांगला आहे, पण स्वतःच्या मोठेपणाबद्दल त्याला प्रचंड भ्रमिष्ट प्रौढी आहे.

त्यांच्या तथाकथित चमत्काराबद्दल मला कदापि आकर्षण वाटले नाही. केवळ शब्द पाळणे यासाठी मी हा खटाटोप करीत होतो.

आधुनिक घरातून मेहेरबाबाने त्याचे मुख्यालय थाटले होते. मला न्यायाधीश खंडालवाला यांनी सांगितल्याप्रमाणे, मेहेरबाबा माणूस साधा आहे; पण स्वतः विषयी गैर समज केलेला आहे. हेच विधान या तेथील राहण्यात पटले.

मला तेथील वास्तव्यात हे जाणवले की बाबा मला टाळतो. कारण मी भेटलो त्या दैवी महात्म्यांच्या मानाने त्याचे स्थान नगण्य होते. आणि अहंकाराने त्यांच्या महत्तेविषयी आदरपूर्वक बोलणे मेहेर टाळीत असे. माझ्या वास्तव्यात अवतारी पुरुष भासवण्यात, आपल्या नसलेल्या दैवी शक्तींचा प्रसार अनुयायांकरावी करणे यात मेहेरचा वेळ जात असे.

वृद्ध मुस्लीम फकीर हजरत बाबाजान या दैवी शक्ती असलेल्या संत निश्चित होत्या. पण त्यांच्या आशीर्वादाने लाभलेला अध्यात्मिक वारसा मेहेरबाबाला सांभाळता व वाढविता आला नाही. उलट आत्मप्रौढीच्या हव्यासाने त्याने ती दिव्य शक्ती घालविली.

दुर्दैवाने प्रसिद्धीच्या हव्यासाने पिडीत असे अनेक फोल योगी भारतात आहेत. आपल्या नसत्या चमत्कारा बद्दल अनुयायांकरवी खोटा प्रचार करवून त्याला बाजारू स्वरूप ते देत आहेत. उलट खरे योगी प्रसिद्धीपासून दूर असून परोपकारी वृत्तीने निस्वार्थी मदत करीत आहेत मी लवकरच मेहेरबाबाचे निवास स्थान सोडले.

पाठ १५ वा **विचित्र समोरासमोर भेट**

पश्चिम भारतात फिरत असता, एका दुपारी आम्हाला एक वृद्ध योगी चंडीदास त्याच्या शिष्यासमवेत रस्त्याच्या कडेला भेटले. आम्ही त्यांना कार मध्ये घेतले. हा योगी मूळ बंगालचा. गेले दोन वर्षापासून गावोगाव हिंडत असे. वाटेत गाडीत काही बिघाड झाला आणि आम्हाला एका छोट्या वस्तीपाशी थांबावे लागले. वस्तीतील मुखीयाने आम्हाला चहा दिला. योग्याभोवती गर्दी झाली. त्यांना कुणी एका झोपडीत नेले. आम्ही बसलो असता त्या योग्याला कुणी शोधून आणले. एकाएकी ती उंच व्यक्ती तेथे आली त्याचे डोळे विलक्षण तेजस्वी होते.

माझ्याशी हंसत बोलत जमिनीवर आसन घालून ते बसले. मला विचारले, तुम्ही फार हिंडलात, स्वामी महाशय कसे वाटले? मला आश्चर्य वाटले. याला हे कसे समजले ? त्यांनी माझे हृदय जिंकले. पण आपण कां विचारता ? मी विचारले. मी असेही म्हणालो की, मला त्यांना परत भेटायला आनंद होईल.
त्या योग्याने मला सांगितले, आता तुम्हाला ते भेटणार नाही. ते यम दरबारात गेले आहेत.

चंडीदास म्हणाला, मला एकच साधना उत्तम वाटते, ती म्हणजे आपण वर्तमानातच राहावे. काळ अस्तित्वात नाही तो आपण निर्मिला आहे. वर्तमान मात्र सत्य आहे.

मला चंडीदासने सांगितले, माझे ऐकणार असाल, तर तुम्ही जेथून हे भारत भ्रमण चालू केले; तेथे परत जा. आणि नव्या महिन्याच्या पहिल्या चंद्र दर्शनाचे वेळी तुमचा उद्देश सफल होईल.

मी विचारले, म्हणजे मी परत मुंबईला जाऊ ? चंडीदासने मान डोलाविली, आणि लवकर हे करा असे निक्षून सांगितले. त्याने हेही सांगितले की, भारतातच अपुरी राहिलेली साधना पूर्ण होईल.
*
चंडिदासच्या सूचनेनुसार मी कार मुंबईकडे वळविली. मझ्या जुन्याच हॉटेलात उतरलो.

मी मनाने दमलो होतो. देहाने अस्वस्थ होतो. हजारो मैल मी फिरलो. त्याची फलश्रुती काय? युरोपातील नाच, जेवण, ब्रिज, आणि व्हिस्की-सोडा याहून अगदी भिन्न भारत मी पाहिला होता. ज्या ज्या ठिकाणी मी पाहुणचार घेतला तेथील साधेपणा सौजन्य हे मला फार भावले. पण माझ्या तब्येतीला विशेष मानवले नाही. आणि उत्तर भारताच्या यात्रेत मिळालेल्या गैरसोईच्या अन्नाने, वाईट हवेने आणि अनियमित जीवन क्रमाने माझी तब्येत बिघडली.
यांत गोष्ट शिकलो ती म्हणजे मला फसवे आणि खरे अध्यात्ममार्गी ओळखता येऊ लागले.

स्वतःवर नित्य नियंत्रण ठेवावे लागत असल्याने प्रचंड ताण मनावर आलेला होता. चांगली गोष्ट म्हणजे, अध्यात्मशक्तीने बऱ्यापैकी बाळसं धरलं होतं. माझ्या अंतर्मनात डोकावले तर, महर्षींचा ठसा स्पष्टपणे उमटलेला दिसत होता. एक मन मला त्यांचेकडे जायला प्रेरित करीत होते. दुसरे मन म्हणत होते, ते तर किती दूरच्या टोकाला आहेत. शिवाय माझी बिघडलेली तब्येत. आता फार उशीर झालायं. माझे तर बोटीचे तिकीट पण पक्के झाले.

द्विधा अवस्थेत त्या संध्याकाळी जेवण घेऊन मी परतलो, तेंव्हा माझेसाठी एक पत्र आलेले होते. कव्हर सांगत होते, ते पत्र बऱ्याच ठिकाणाहून फिरत येथे आलेले होते. ते मद्रासच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या सदस्याकडून होते. जे लेखकही होते. त्यांत महर्षींच्या बद्दल आदरपूर्वक उल्लेख होता. आणि माझ्या त्यांचेकडे जाण्याने माझा फायदाच होणार होता असे आर्जवून लिहिले होते. माझ्या अंतर्मनात असलेले त्यांच्याकडे जाण्याचे विचार त्या पत्राने पक्के केले.

मी मद्रासला पोचल्यावर माझा प्रवास महर्षींच्या दिशेने चालला, हे लेखक महाशयांना कळविले. त्यांना हे अपेक्षित होतेच. कारण महर्षींनीच त्यांना सांगितले होते की, हा तुमचा मित्र सारा भारत फिरेल आणि शेवटी परत येथेच येणार हे नक्की !

पाठ १६ वा **जंगलातील मठात २९५.**

जीवनाच्या दिनदर्शिकेत कांही अविस्मरणीय दिवस येतात. त्याच्या सुखद स्मृती नित्य स्मरणात राहतात. ते सोनेरे दिवस मला महर्षींच्या हॉल मध्ये जातांना अनुभूत होत होते.

ते नेहमीप्रमाणे व्याघ्रचर्मावर हॉलमध्ये मध्यावर बसले होते. अगदी तसेच; जसे माझ्या या आधीच्या भेटीच्या वेळी मी पाहिले होते.

धूप जळत मंद सुगंध पसरवित होता. मी महर्षींच्याकडे सरळ गेलो. थोडक्या शब्दांत माझे मनोगत व्यक्त केले. आणि त्यांनी स्मित हास्याने मौनाने उत्तर दिले.

मी पुन्हा माझ्या परत येण्याचा उद्देश सांगितला.
महर्षी म्हणाले, हा गुरु आणि शिष्य वगैरे काय शब्दांचा खेळ चाललायं ? ज्याला स्व उमगला, तेथे ना गुरु ना शिष्य ! तुझा गुरु तूच अंतरंगी शोधला पाहिजे. तुझ्या अध्यात्मिक अंतरंगात. गुरुचे शरीर म्हणजे गुरु नसतो. त्याचा 'स्व ' देह कदापि नसतो.
मी प्रत्युत्तरात गुंतलो नाही. ती दुपार मी माझ्या दीर्घकालीन वास्तव्याच्या व्यवस्थेत घालविली.
*

पुढच्या कांही आठवड्यांनी मला अनपेक्षित जीवनशैलीचा सराव करून दिला. माझे दिवस बहुतांशी महर्षींच्या दिवाणखान्यात व्यतीत होतं. त्यांच्या सान्निध्यात मला आजवर अनभिज्ञ अशा त्यांच्या न उमगलेल्या ज्ञानाचे अनेक पैलू उमगले. माझ्या मनी दडलेल्या अनेक प्रश्नांचीही सहजी हलकेच उकल होत गेली.

मुख्य मठापासून सुमारे ३०० फुटावर, घाईने उभारलेल्या माझ्या झोपडीतील जमीन टणक होती. भोवती निवडुंगाचे कुंपण होते. छप्पर पावसापासून बचाव करण्यास सक्षम होते. जमिनीवरल्या ब्लँकेटवर अंग ताणून दिले असता, संवयीच्या अभावाने अपुऱ्या झोपेची तक्रार मात्र कायम राहिली.

सकाळी लवकर उठून जंगलातली पहाट हलकेच हिरव्या रंगातून सोनेरी रंगांना परिधान करतांनाचे दृश्य रम्य असे. पाण्यात सूर मारून खळबळ करीत, चपळ पोहण्याची मजा काही और असे. त्या खळबळीने पाण्यातले साप आणि अन्य जलचर सहजी दूर होत. मग सकाळची तयारी झाली की झकास चहाचे घुटके ताजे तवाने करीत.

माझा कृष्णवर्णी द्रविड नोकर राजू चहा झाल्याची ललकारी द्यायचा. माझ्या सहवासात तो कामापुरते इंग्रजी शिकला होता. स्वयंपाकात बऱ्याचदा माझी मदत आवश्यक असे.

बगीचातील फेरफटका आटोपून महर्षींच्या दिवाणखान्यात विनम्रभावे गेल्यावर मौनातून खूप शिकायला मिळे. अकरा वाजता मी कुटीत परत जाई. दुपारच्या भोजनानंतर पुन्हा महर्षींचा सत्संग घडे. दुपारी बऱ्याचदा महर्षी माझ्या कुटीत अनपेक्षितपणे येत. त्यावेळी माझ्या वैयक्तिक प्रश्नांची उकल मी करून घेई. पण कित्येकदा माझ्या प्रश्नांवर त्यांचे उत्तर दूरवर शून्यात पहात, पाळलेले मौन असे. माझे बोलणे त्यांचे

कानी पडले की नाही असे मला सुरवातीला वाटे. पण मग त्यांच्या उत्तराचीच ही शैली आहे हे मला उमगू लागले.

मला उमगू लागले की, प्रश्न सोडविण्यापेक्षा काळावर त्याची उकल सोपवून, स्वतःचे अंतरीचे निरीक्षण अध्यात्मात जास्त फायदेशीर आहे.

एकदा बोलतांना मी माझ्यातील उणिवांची जाणीव करून दिली. मनावरच्या अनाठायी बोज्यांनी अक्षमता वाढते. आपण दुर्बल आहोत, अशी समज असणे हेच चूक आहे. प्रत्येकजण दैवी अस्तित्व आहे. त्यामुळे निसर्गतःच पुरता बलवान आहे. दुबळे आणि सैतानी विचार हे संवयीचे भाग आहे. ते त्याचे स्वरूप नाही. महर्षींच्या अनुभूतीवर आधारीत शब्दांनी उभारी येई. मार्ग उजळ होई.

एकदा मी त्यांना मी म्हणालो, या सुनसान वनात कुणालाही अध्यात्मिक साधना साधणे कठीण वाटत नाही. कारण अडथळे येणारे येथे कांही नसतेच. ते उत्तरले, *एकदा स्वतःची खरी ओळख पटली की, मग वन काय आणि लंडन काय, कांही फरक पडत नाही !*

भारतात भौतिक प्रगती मंदावली आहे हे महर्षी कबूल करीत. ते म्हणत, आमच्या गरजा कमी आहेत. पण समाज सुधारणा आवश्यक आहेत, हे नाकबूल मात्र नाही. कमी प्रगतीचा संबंध मात्र मिळणाऱ्या आनंदात कमतरता आणतो असे निश्चित नाही.

*

महर्षींचा जन्म मदुरा पासून ३० मैलावरील एका खेड्यात १८७९ त झाला. वडील धार्मिक वृत्तीचे होते. परोपकारी वृत्ती हा त्यांचा सहजभाव होता. मदुराला महर्षींचे शिक्षण झाले. तेथे ते इंग्रजी शिकले.

बालपणी खेळाची आवड असलेला रमण कुस्त्या, पोहणे यांतही प्राविण्य ठेऊन होता. तत्वज्ञानाची आणि अध्यात्माची आवड अशी विशेष होती, असे नव्हे. झोपेत चालण्याची एक संवय त्यांना होती. तेंव्हा वाटेतील अडथळ्यांनी त्यांची झोप विचलित होत नसे. सकाळी उठल्यावर त्याची पुसटशी सुद्धा आठवण नसे. मनो वैज्ञानिकांना त्यांच्या झोपेतील भोवतालच्या भानाचे कारण त्यांच्यातील सुप्त शक्ती वाटे.

एकदा मदुराईहून आलेल्या कुणा पाहुण्याने अरुणाचलाच्या यात्रेचे वर्णन केले. त्या पर्वताविषयी रमणच्या मनात नकळत खोल स्थान बळकावले. त्यांनी त्याबद्दलची बरीच माहिती मिळविली.

सोळा, सतराव्या वर्षी एके दिवशी शाळा सोडून कुणालाही न सांगता सहा आठवडे अभ्यास बाजूला टाकून बाल रमणने मदुराईहून प्रयाण केले, ते कायमचेच ! आता त्याचे जीवन हेच यापुढील दिव्य शाश्वत पाठ देणारा शिक्षक झाले होते. त्याच्या अभ्यासाचे क्षेत्रच आता बदलले होते.

आपल्या खोलीत रमण एकटाच शांत बसला असता, त्याच्या मनाला मरणाच्या भयाने घेरले. जरी त्याला कोणतीही व्याधी किंवा त्रास नव्हता तरी, आता मी मरणार असे त्याच्या मनाने घेतले. आणि विशेष म्हणजे मृत्यूला भेटण्यासाठी त्याची मनाने तयारी झाली.

त्याने आपले शरीर प्रेतवत जमिनीवर ताणून दिले. डोळे आणि तोंड मिटले. श्वास रोखणे चालू केले. स्वतःशी बोलू लागला, हे आता मृत शरीर आहे. ते स्मशानात नेतील आणि थोड्या वेळेत त्याची केवळ राख उरेल. देह संपला तरी मी थोडाच संपणार आहे? आता हा देह कडक आणि शांत झाला. पण माझ्या

अस्तित्वाच्या जाणीवेत त्याने काय फरक पडला? उलट देहाची स्थिती कांही असली तरी, मी अधिक शक्तिशाली वाटत आहे.

त्या घटनेनंतर रमण दीर्घ शांत सविकल्प समाधी स्थितीत होता. त्याला' स्व ' स्वच्छ पणे उमगले. तेच तर शाश्वत चिरंजीव दैवी अस्तित्व हे त्याचे मूळ रूप होते.

रमणला आपल्या त्या चिरतरूण अस्तित्वाची खोल जाणीव झाली. आता अभ्यास, खेळ, मित्र, आणि इतर सारे क:पदार्थ वाटू लागले. आपल्या अंतर्यामी केंद्रात स्थिरावलेल्या आत्मस्वरूपाची अशी स्पष्ट जाण अचानक अनपेक्षितपणे झाली होती. आता मरणाचे कसले भय? अंतरीची नीरव शांती आणि आनंद याची सुखद अनुभूती आणि अध्यात्मिक अलौकिक शक्ती जाणीवेत आली ती कायमचीच ! आता कोण काय बोलते, त्याचे परिणाम होईनासे झाले. नित्य एकांत अनुभूत होऊ लागला. आता डोळे उघडे असले तरी, नित्य लक्ष अंतरी गुंतलेले असे.

त्याच्या अशा विलक्षण जगावेगळ्या वर्तनाची दखल इतरांनी प्रकर्षाने घेतली. हा रमण आता पूर्वीचा नाही हे पक्के समजले. त्याचा मोठा भाऊ त्याचे खोलीवर आला. त्याला वाटले हा होमवर्क करीत असेल. पण डोळे मिटून रमण खोल ध्यानात बुडाला होता. शाळेची पुस्तके वह्या इतस्तता पडली होती. भाऊ चांगलाच चिडला. तो तारस्वरात ओरडला, हे तू काय चालवेले आहेस? तुला योगीच व्हायचे, तर शिक्षण हवे कशाला?

योगमार्गाच्या सीमारेषेवरल्या बाल रमणला हे शब्द चांगलेच जिव्हारी लागले. त्यांत त्याला तथ्यही वाटले. त्याने शांतपणे भावाच्या सांगण्यानुसार सारे सोडण्याचा निर्धार केला. वडील तर लहानपणीच गेलेले होते. काका आणि इतर भाऊ आईची काळजी घेतीलच. येथे आता कांही कर्तव्य उरलेले नाही. डोळ्यासमोर उभे राहिले ते अरुणाचलाचे देवालय.

महर्षी मला पुढे म्हणाले, ज्या ओढीने तू मुंबईहून इकडे खेचला गेलास, त्याच ओढीने मला सहजी येथे मदुराईहून आणले. जाण्याआधी एक थोडक्यात निरोपाचे पत्र मागे सोडले होते. आजही ते तामिळ भाषेतील पत्र जपून ठेवले गेलेले आहे. त्यातील आशय असा;

“ मला वडिलांचा वारसा आणि उपदेश पुढे चालवायचा आहे. मी त्यासाठी जात आहे. त्यामुळे कुणी काळजी करू नये उगाच पैसेही  खर्चू नयेत.”

त्यावेळी खिशात केवळ तीन रुपये होते. आणि दक्षिणेकडील अनभिज्ञ भागाचा प्रवास आरंभिला होता. उघड्या जगाचा काहीच अनुभव नव्हता. त्या प्रवासात कुणी अज्ञात गूढ शक्ती निश्चितपणे त्याची काळजी घेत होती. ठरल्या मुक्कामी पोचलेला रमण पुरता कंगाल झालेला होता. पण वैराग्याची अंतरीची धग जराही कमी झालेली नव्हती. जवळजवळ अक्षरशः नग्न रमण मंदिरात एका बाजूला ध्यानांत रंगून गेलेला पाहून पुजाऱ्याने त्याची चांगलीच कानउघाडणी केली. दुसऱ्या पुजाऱ्यांनी सांगितल्यावर रमणाचा लंगोटी नेसणे हा नित्यक्रम झाला.

सहा महिने मंदिरातील जागा बदलीत आणि पुजाऱ्याने एकवेळ दिलेल्या भातावर गुजराण करीत राहिले. मंदिरात भाविकांच्या वाढत्या गर्दीने मंदिर सोडून दूर गांवाबाहेरील एकाकी देवळात  राहून ध्यानमग्न रमण जीवन क्रमू लागला. कुणी त्रास देत, कुणी टिंगल करीत, कुणी न कुणी कांही खायला देत असे. ते तसे दीड एक वर्ष गेले. मौन अबाधित राहिले. आयुष्य साक्षी भावाने जगणे वळणी पडले. अखेर ध्येय पूर्णपणे गांठले गेले. मग निवारा, खाणे- पिणे सारे गौण झाले.

आपल्या पूर्वायुष्याबद्दल कुणालाही कांही कळू न देण्याची खबरदारी घेतली, तरी त्यांच्या आईने त्यांना बेपत्ता होण्यापासून दोन वर्षांनी शोधून काढले. आईने परत येण्यासाठी सारे प्रयास केले. पण रमण अविचलित राहिले. त्यांनी दैवी शक्ती माझी काळजी घेत आहेत, जे घडत आहे, ते चांगल्यासाठीच होते. मी समाधानी आहे, असे सांगून आईला परत पाठविले.

लोकांची वर्दळ वाढली आणि मग डोंगरावर एकांत शोधीत, मोठ्या गुहेत अनेक वर्षे मुक्काम ठोकला. याच गुहेत पूर्वी एक मोठा योगी रहात होता.

हिंदूत योग्यांच्या देहविसर्जनानंतर त्याचा देह जाळीत नाही, पण पुरून समाधी स्थळ तयार होते. कारण योग्याच्या देहांतील अदृश्य चैतन्य लहरी मृत्यू नंतरही सोडून जात नाहीत. भाविकाना त्यांतून अनेक काळ मार्गदर्शन मिळत राहते.

१९०५ मध्ये जेंव्हा प्लेगची साथ आली. त्यावेळी सारे प्रदेश निर्जन झाले. अरुणाचल त्याला अपवाद नव्हते. त्या नंतर मोकळ्या वातावरणाने वाघ, चित्ते रस्त्यावर फिरत महर्षींच्या गुहेजवळून कित्येकदा ते जायचे, पण महर्षींना त्यांचे भय वाटले नाही. त्यांचा निवास तोच राहिला.

एक वाघ तर रोज रात्री येऊन महर्षींचे हात चाटायचा. कित्येकदा तो महर्षींपाशी रात्रभर बसून राही, एका दुपारी महर्षी गुहेच्या अरुंद तोंडाशी बसले होते. गुहेच्या दगडांच्या फटीतून एक भला मोठा नाग सळसळत आला, आणि त्यांचे समोर निश्चलपणे फणा काढून शांत ताठ राहिला होता. कांही मिनिटे एकमेकाला पहात होते. नंतर नाग निघून गेला.

आता त्यांचा अनुयायी परिवार सुद्धा वाढू लागला होता. एकांतवासच हवा, अशी आता निकड राहिली नव्हती. एके दिवशी ब्राह्मण पंडित गणपती शास्त्री यांनी बाह्य जीवनक्रमात वेगळाच बदल करविला. शास्त्री कांही अभ्यास आणि ध्यान यासाठी मंदिराजवळ आलेले होते. त्यांना या तरुण योग्याबद्दल माहिती मिळाली आणि जिज्ञासेने ते शोधीत आले. त्यावेळी रमण यांचे ध्यान दुपारच्या सूर्यावर लागले होते. कित्येक तास एकटक असे ध्यान पाहून ते चक्रावून गेले.

थोड्या वेळाने वेळाने अनेक दिवसांचे न सुटलेले अध्यात्म मार्गातले प्रश्न त्यांनी विचारले, आणि सरळ स्वच्छ उत्तरांनी शास्त्री सुखावले. त्यांनी सरळ दंडवत घातला. आपल्या अनुयायांना हे साधेसुधे योगी नसून महर्षी आहेत, असे सांगितले. तेंव्हापासून तीच त्यांची ओळख ठरली.

कांही अनुयायांनी लाकडी बंगल्याचा निवारा तयार केला. कांही दिवसांनी भावाच्या मृत्युनंतर त्यांची आई त्यांचेपाशी राहण्यास आली. ती सहा वर्षे तेथे होती.

महर्षींचा लौकिक दिवसेंदिवस अधिकाधिक वाढू लागला. बंगल्याचा आकारही वाढू लागला. महर्षींनी पैसे कधीच स्विकारले नाहीत. त्यांच्याकडे कांही भेट वस्तू आल्या, तर ते वाटून देत.

एकदा कांही चोर महर्षींच्या हॉल मध्ये शिरले. त्यांना वाटले भरपूर कांही मिळेलं. पण नोकरासाठी ठेवलेल्या थोड्या रुपयांखेरीज हाती काही लागलं नाही. निराश होऊन त्यांनी महर्षींना चोप दिला. ते परत निघाले तेंव्हा महर्षींनी त्यांना जेऊन जा, म्हणून सांगितले. त्यांच्या मनांत काहीच तिरस्कार व राग नव्हता.

कांही दिवसात ते चोर दुसरीकडे चोरी करतांना पकडले गेले, आणि शिक्षाही झाली.

*

महर्षींची कीर्ती वाढत गेली. ते सहसा मौनात असतं. पण त्यांच्या नुसत्या प्रेमळ पाहण्याने व्याधीग्रस्त बरे होतं. कित्येकांच्या समस्या त्यांच्या नजरेच्या स्पर्शाने दूर होतं. त्यांच्या सान्निध्यात मौनातून प्रश्नांची उत्तरे मिळत.
त्यांच्या साधनेत फक्त एकाच प्रश्नाचा खोलवर शोध घ्यायचा, 'मी कोण ' हा हाडामासाचा देह ,रक्त, मन, विचार, वृत्ती? सारे वजा होतं, निखळ चैतन्य अस्तित्वाची जाण हेच माझे अविनाशी सदानंदी स्व रूप आहे हे प्रत्यक्ष अनुभवायला हवं. नुसतं बौद्धिक पातळीवर नव्हे तर अनुभूतीच्या देहातीत अवस्थेत. हा शोध घेतांना कोणताही पूर्वग्रह मनी धरायचा नाही. अमुकच अनुभूती येईल, असं गृहीत धरायचं नाही असं महर्षीचं सांगणं असे. म्हणूनच त्यांनी साधनेची अशी विशिष्ट प्रणाली आखली नाही.

त्या प्रश्नाचा पाठपुरावा करीत रहा. खोल दूरवर अंतरी त्याचं उत्तर आहे. अंतरी आपल्या व्यक्तिमत्वाची पुरती तपासणी करीत रहा. मी हा विचार कोठून उगम पावतो त्याच्या बुडाशी जा. एक दिवस हे तपासाचं चक्र मंद होईल. विचार शमतील. आंतला आवाज एकदम जागा होऊन, त्या प्रश्नाचं उत्तर स्व च्या अनुभूतीत देईल. त्या अंतर्ज्ञानाचा मागोवा घ्या. तत्व आणि मी यात अद्वैत अनुभूत होईल.

पाठ १७ वा **विसरलेल्या सत्याचे संकलीत लेखन**

एक दिवस कुणी अति प्रसिद्ध व्यक्ती महर्षींना भेटायला आली. महर्षींच्या अगदी जवळ बसले. ते कृष्णवर्णी, पण चेहरा उजळ होता. ते कांहीच बोलले नाहीत. पण महर्षींनी त्यांचे हंसून स्वागत केले. माझ्यावर त्यांची चांगलीच छाप पडली. मला जणु ते बुद्धाची मूर्ती वाटले. त्यांच्या चेहऱ्यावर नीरव शांती विलसत होती. त्यांच्याशी माझी नजरानजर झाली, त्यावेळी त्यांनी बराच वेळ दृष्टी तशीच ठेवली. शेवटी मीच नजर वळवली. दुपारपर्यंत ते एक शब्दही बोलले नाहीत.

माझा त्यांच्याशी संपर्क झाला तो दुसऱ्या दिवशी, तेही अगदी अनपेक्षितपणे ! मी हॉल मधून माझ्या निवासात चहा बनविण्यासाठी गेलो, दार उघडून उंबरठ्यावर होतो, तोच माझ्यापासून थोड्याच अंतरावर कांहीतरी फुऽस्स फुऽऽस्स करीत जातांना भासले. अंधारात नीट दिसेना. बहुदा सर्प असावा. मी भयाने जागीच  थिजलो. काय करावे कांहीच सुचेना. मृत्यू जणु अगदी कांही पावलावर येऊन थबकला होता. माझ्या नसा ताठरल्या. जरी भय आणि तिटकारा दोन्हींनी हृदय व्यापले पण अंधुक प्रकाशातही माझे डोळे त्या अति देखण्या डौलदार उभारल्या फण्याने सुखावले. माझे लक्ष त्यावर पक्के खिळले. तो उमदा प्राणीही माझ्या नजरेला नजर भिडवून होता.

मी कसाबसा नीट भानावर आलो. आणि काठी शोधण्यासाठी मागे फिरलो. मागे ते कालचे तेजस्वी पुरुष दिसले. त्यांचा रुबाबदार चेहरा आणि विलक्षण तेजस्वी डोळे दिसताच, मी जरा शांत झालो. ते माझ्या कुटीत आले. क्षणांत साऱ्या स्थितीचा आढावा घेतला, आणि प्रवेश करण्यासाठी त्यांनी आंत पाऊल टाकणार तोंच मी जोरात ओरडून त्यांना सावध केले. मी पुन्हा बेचैन झालो. कारण ते निःशस्त्र होते. त्यांनी त्यांचे दोन्ही हात त्या सर्पाच्या दोन्ही बाजूला धरले.

सर्पाची वळवळती जीभ चांगलीच पुढे मागे होऊ लागली. तेवढ्यात माझ्या ओरडण्याने आणखी दोन जण तेथे धावत आले. तोवर ते अनाहूत गृहस्थ सर्पाच्या अगदी जवळ पोचले होते. त्या सर्पाने त्याचा फणा त्यांच्या पायाकडे झुकविला होता. शेपटी हलकेच हलवू लागला होता.

ते दोघे जण येण्याची चाहूल लागली, तसे सर्प हलकेच खोलीबाहेर निघून गेला. आलेला एक जण, जो गांवातील दुकानदार होता, म्हणाला हा जवान नाग होता. तो त्याचा आदरभाव व्यक्त करण्यासाठी महर्षींचे दर्शनाला आणि त्यांच्याशी बोलायला बऱ्याचदा येतो.


योगी रामय्या

आपल्या पाहुण्याने निर्भयपणे परिस्थिती हाताळली याचे मला कौतुक वाटले. मी तसे म्हणताच, तो दुकानदार म्हणाला, तो योगी रामय्या आहे. फार पोचलेला सिद्ध आहे. गेले दहा वर्षांपासून, महर्षींचा तो प्रगत शिष्य आहे.
मला त्यांचे विषयी एवढेच समजले की, त्यांचे बोलणे जवळ जवळ नसतेच, कुणाशीही ते मिसळत नाहीत. एका डोहाजवळ त्यांनी दगड गोट्यांनी बनविलेल्या लहानशा घरात ते राहतात.
मी त्यांच्या निवसापाशी गेलो, ते पाण्याचे पितळेचे भांडे घेऊन चालले होते. मी विनंती केल्यावरून त्यांनी फोटो काढू द्यायला नकार दिला नाही.

रामय्या चाळीशीचे आसपास असावेत. नेल्लोर जिल्ह्यात त्यांची बरीच प्रॉपर्टी आहे. त्यांचा परिवार आणि प्रॉपर्टी यातून त्यांनी अंग काढून घेऊन, योगासाठी बहुतांशी वेळ काढतात. अशा तऱ्हेने त्यांनी पुरता संन्यास घेतलेला नव्हता. तेथे त्यांचा मोठा शिष्य परिवार आहे. वर्षातून २-३ महिने ते महर्षींना भेटायला नेहमी येतात. तरुणपणांत योगासाठी कुणा उत्तम गुरूच्या शोधात, दक्षिण भारताची फार मोठी सफर त्यांनी केलेली आहे. त्यांनी वेगवेगळ्या २-३ जाणकारांकडून शिकून कांही शक्ती मिळविल्या आहेत. श्वसन नियंत्रण आणि ध्यान यांत त्यांची छान गती आहे. त्यांची प्रगती ज्ञानार्जन देणाऱ्यांपेक्षाही पुढे गेली आहे.

आमची बोलणी संपत आली. मी शेवटी त्या जवान नागाबद्दल विचारणा केली. ते उत्तरले, भीति वाटावे असे जगांत माझ्यासाठी कांहीच नाही. मी मनात द्वेष वा तिरस्कार न धरता उलट मनी प्रेमभावना धरून त्याचेकडे गेलो. आणि मग सारे सोपे झाले.

आमची चांगल्यापैकी अबोल अतूट मैत्री जमली. एके दिवशी माझ्या डोक्यावर हात ठेऊन त्याने मला आशीर्वाद दिले. आणि तेलगूतील काही पेन्सिलीने लिहिलेल्या नोटस् दिल्या. मी त्याचे भाषांतर करविले. विशेष म्हणजे, अगदी कमी संभाषण असताही मला रामय्या बद्दल फार जवळीक वाटू लागली.

माझ्या एक धक्कादायक गोष्ट लक्षात आली की, आता माझेजवळच्या उरलेल्या पैशात भागणे शक्य नाही आणि लवकरच मी गाशा गुंडाळणे उत्तम. मी विचारांत असता, अचानक एके दिवशी माझ्या खोलीच्या दरवाज्यावर थाप ऐकली. आश्चर्य म्हणजे रामय्या समोर.

मी मोडक्या तोडक्या देहबोलीने माझी अडचण विषद केली. त्याने मला बाहेर बोलावले. दुपार चांगलीच तापली होती,. आम्ही बरेच दूर गेलो. एका ठिकाणी आम्ही थांबलो. रामय्या खोल ध्यानात गेला. त्या ध्यानकालात माझ्या अंतरंगी दैवी कर्तृत्व शक्तीची निश्चिती जाणवली.

उद्याचा विचार करणे फोल आहे, कारण उद्याची आंखणी उच्च शक्ती करीत असते. आपण काळजी करून त्या दैवी शक्तीवर अविश्वास दाखवितो. या विचारांनी मन हलके झाले. दैवी शक्ती अंतरी आरूढ झाली. रामय्याने हलकेच माझ्या खांद्याला स्पर्श केला उठण्याची खूण केली.

हाती हात धरून आम्ही रात्रीच्या काळोखांत चालू लागलो. इतर वेळी माझ्या मनात नको त्या शंका, भय उद्भवले असते, पण आता मी निःशंक होतो.

जंगली जनावरे वाटेत दिसत होती. अगदी जवळून जात होती. एका जागी नागोबा वेटोळ्यात बसले होते. कुठे मोठाला विंचू नांगी उंचावत फिरत होता. रामय्याच्या सहवासात मला भय नव्हते. त्याच्या अस्तित्वाचे कवच माझे रक्षण करीत होते.

*

या दक्षिण भारताच्या एका कोपऱ्यात दूर या दैवी अस्तित्वाच्या जवळ मला कुठल्याशा महा शक्तीने खेचून आणले होते. या महा मानवाच्या सत्संगात येणे ही दैवी कृपाच म्हणावी. त्यांच्या सहवासाने अमुल्य ज्ञान लाभत होते. ऐहिक बंधने शिथिल होत होती. इतके साधे आणि उदात्त जीवन, पण दैवी महाशक्तीचा चिरंतन खजिना. त्यांच्या साधनेचा मार्ग एकच. तो म्हणजे कळकळीने अंतरीचा शोध.

आता निरोपाची वेळ जवळ येत चाली होती. एका सायंकाळी मी ध्यानाला बसलो.माझ्या डोळ्यासमोर बसलेल्या महर्षींची मूर्ती तरंगली. आता मूर्तीचा आकार विरळ होत जाणवले, ते केवळ त्यांचे अस्तित्व.

त्या रात्री अंतर्यात्रा सुरु असता, विचार विरले. वेगळ्या अस्तित्वाची ऐहिक ओळख पुसली गेली. देह हे साधन आहे, मी नव्हे ! असे स्पष्ट जाणवले. माझे चातुर्य आणि मीपण यापासून अगदी वेगळे होऊन निव्वळ निखळ अस्तित्व अनुभूत झाले.

हा स्व चा शोध जणु कोलंबसच्या शोधासारखा होता. महर्षी विचार बंद करायला नव्हे; तर त्यांचे उगमस्थान शोधायला सांगत. आपल्या खऱ्या अस्तित्वाची अनुभूती होताच, विचार नष्ट होतात, हे मी प्रत्यक्ष अनुभवले. संपूर्ण शरणागतीने अक्रियाशीलता सहजी लाभली होती. देहाची कार्ये मी फक्त साक्षीभावाने पहात होतो. आता काळाचा प्रवाह स्थिरावला होता.

हलकेच देहाचे वेगळेपण स्पष्ट जाणवले. जगाच्या व्यवहारातून मी मुक्त झालो होतो. त्या चैतन्यातून निघणाऱ्या लहरी जे करायचे ते करीत होत्या. माझा त्याशी संबंध नव्हता.

त्या दिव्य अनुभूतीतून मी परतलो. पण तो पूर्वीचा पॉल नव्हता. त्या दैवी आशीर्वादाने धन्यता पावलेले माझे अस्तित्व देहातीत होते. पूर्ण मुक्त. निराश्रय ! सर्वत्र माझे अस्तित्व मला अनुभूत होत होते. प्रेमाचा खरा अर्थ उमगताच समभाव सहजभाव झाला.शब्दांत ती अनुभूती मी कशी उतरवू ?ते अनुभवता येतं, व्यक्त करता येत नाही.

*

**विस्मृत सत्याचे संकलन**

मानवाचे दिव्य नाते असलेल्या दिव्य अस्तित्वाने त्याला त्याच्या आईपेक्षाही जास्त अंगावर पाजले आहे. जेंव्हा त्याच्या मनी प्रकाश पसरेल, तेंव्हा त्याला नक्की उमगेल की;

- *त्याच्याच स्वतःच्या भूतकाळात फार पूर्वी त्याने दैवी उदात्तता मस्तकी बांधून अत्युच्च निष्ठेची शपथ वाहिली होती. आणि ईश्वराबरोबर तो चालला होता. जर आज हे कार्यमग्न जग त्याचेकडून कांही उद्दाम मागणी अधिकारवाणीने करीत असेल, आणि तो त्याची परिपूर्ती करण्यासाठी धडपडत असेल तर ज्यांना घेतलेल्या शपथेचा विसर पडलेला नाही, असे कुणी योग्य वेळ आल्यावर त्याला निश्चित आठवण करून देतील.*
- *या न संपणाऱ्या भौतिक शर्यतीतील एक भागीदार म्हणून एक गोष्ट निश्चित आहे की, त्याने त्याच्या मूळ सत्य स्वरूपाकडे जवळ जवळ पुरती डोळेझांक केली आहे. पण त्याने त्याच्या अंगभूत तेजस्वी भव्यतेचा थोडाच विनाश होतो ? अगर त्यांत थोडीच कांही कमतरता येते?*
  *इंद्रियांच्या आहारी जाऊन तो भले निद्रिस्त झाला असेल; आणि त्याला याची पुरती विस्मृती पडली असेल, पण एक दिवस त्याला त्या दिव्यतेचा हात लांब होऊन जेंव्हा स्पर्श होईल, तेंव्हा त्याला निश्चित सारे आठवून आपल्या आत्म्याची खरी ओळख पटेल आणि सत्य स्वरूपानुसार त्याचे आचरण होईल*
- *दैवी मूल्यांचा विसर पडल्याने, मानव जीवनात यांचे अनुसरण विसरला आहे. म्हणून तो सल्यासाठी दुसऱ्याच्याकडे जातो. त्याच्या अंतरी वसणाऱ्या दैवी दिव्यतेची अध्यात्मिक अधिकारी खात्रीलायक शक्ती निःशंक असतांना असे करण्याची काय आवश्यकता? आकलन होण्यास कठीण असणारा [स्फिंक्स] भौतिक पसाऱ्यात गुंतत नाही. त्याचे निश्चयी निर्भय एकटक लक्ष पूर्णतया अंतरंगी असते. त्याच्या मुखावरले हास्य हे आत्मज्ञानी असण्याचे निर्देशक असते.*
- *जो अंतरी पाहतो, आणि त्याला केवळ असमाधान, क्षणभंगुरतेचा खेद, अंधःकार आणि भय हेच दाटलेले दिसते, त्याने उपहासाने त्या विधात्याचे माझ्याकडे दुर्लक्ष कां? अशी उपहासगर्भ शंका बाळगून ओठ मुडपण्याची काय आवश्यकता ?*

  *त्याने वस्तुतः दीर्घकाळ, खोल; अधिक दीर्घकाळ, खोल अंतरी डोकावून पाहिले पाहिजे. अगदी तोवर, जोवर त्याला मंद झुळूक आल्याच्या अस्पष्ट अशा खुणा जाणवत नाहीत. अर्थात यासाठी हृदय शांत व्हायला हवे. त्या अनुभूतीकडे काळजीपूर्वक अवधान दिले पाहिजे. कारण तेच उच्च विचार निर्मिती करून विहरणाऱ्या देवदूतांच्या सारखे मनाच्या पलीकडे जाऊन जीवनाला उन्नत करील. पुढे याच अंतरी लपलेल्या गूढ आणि दुर्बोध असलेल्या त्याचेच अनादि अस्तित्व असलेल्या दिव्य शक्ती आंतला आवाज जागृत होण्याची पूर्वचिन्हे दाखवतील.*

- *प्रत्येक मानवी जन्मात दैवी अविष्कार नवनवीन प्रकारे प्रकटत असतो. पण माणूस जर त्याकडे दुर्लक्ष करील, तर खडकाळ जागेवर बीज टाकल्यासारखे ईश्वरीय प्रकटीकरण वाया जाते. अशा दैवी जाणीवेचा आविष्कार निरपवाद सर्वात होत असतो. माणूस जर त्याकडे दुर्लक्ष करील, तर ईश्वर काय करणार? माणूस वरवर या गुढाची उकल करायचा देखावा करतो. पण तसे करतांना त्याची अहंमन्यता कायम असते. जीवनाचा खरा अर्थ गवसणे दूरच राहते.*
  *प्रत्येक पक्षी जेव्हां बुंध्यापासून वर आलेल्या फांदीवर विसावतो; प्रत्येक बाळ जेंव्हा आईच्या प्रेमळ हाताची पकड सोडीत नाही, त्यातूनच या गुढाची उकल झाल्याचे समाधान त्याच्या निरागस चेहऱ्यावर विलसत असते.*
  *अरे माणसा, ज्यामुळे या जीवनाचा लाभ झाला, ते आत्मतत्व तुझ्या अती दूरचा विचार करण्यापेक्षा अगदी जवळ आणि दिव्य तसेच उदात्त आहे. तुला खऱ्या उपकारक अशा त्या*

*हृदयातून निघणाऱ्या सूक्ष्म अंतःप्रेरणेच्या आदेशांवर पूर्ण श्रद्धा ठेऊन तसे आचरण कर. त्यांतच तुझे कल्याण आहे.*

- *जो माणूस अशा फोल स्वप्नाच्या धुंदीत राहतो की, तो बेभान आकांक्षा त्याला नाचवितील तसेच तो नाचेल आणि तरी आपणावर सुख दुःखाचा बोजा पडू नये. असा विचार करील तर, तो हे विसरतो की, केल्या कर्माचा पुरता हिशेब जीवनकाळात देणे, त्याला क्रमप्राप्तच आहे.*
  *जो आपल्यासाठी अगर इतरांसाठी कांही पापाचरण करील तो आपल्या दुर्दैवाची आंखणी आधीच करून ठेवीत असतो.*
- *जो आपल्या पापाचरणांना इतरांपासून लपविण्याच्या लटपटी करतो, त्याला हे ठाऊक नसते की, तो सर्व साक्षी भगवंतापासून ते कसे लपवू शकेल? या जगाच्या दगडी भिंतीतील न्यायालयांतून जरी तो निर्दोष सुटला, तरी ईश्वरीय न्याय त्याला योग्य वेळी ठरल्या प्रमाणाने फटकारे दिल्या शिवाय कसा राहील?*
  *मात्र ईश्वरीय न्यायदानाची पद्धती आणि कृती अदृश्य असल्याने, तो गाफील राहतो. या जगातील विधीविधानांच्या जाळ्यातून जो लटपटी करून सुटतो, त्याने हे पक्के ध्यानी ठेवावे की, भगवंताच्या न्यायदान प्रक्रियेतून तो सुटू शकणार नाही. तसेही, पश्चात्तापाने लागलेली बोचणी, मनात खोलवर वाटत असलेली खंत आणि आपल्या अक्षम्य कृतीची अंतरीची जाणीव त्याला सुयोग्य शिक्षा देतच असते. त्याद्वारा तो आपल्याला संकटाच्या गर्तेत दर क्षणी स्वतःला ढकलीत असतोच.*
- *जे दुःखाच्या कडवट पाण्यांत डुंबलेले आहेत, अश्रूंच्या धुरकट सावलीत ज्यांच्या जीवनाचा कालखंड व्यतीत झाला आहे, अशांची निशब्द प्रकटीकरणातून नित्य व्यक्त होणारे जीवनाचे खरे सत्य उमगण्याची बऱ्यापैकी तयारी झाली आहे. ज्यांना दुसरे कांहीच हाती लागू शकले नाही, त्यांना शोकाची अनित्यता उमगून हंसऱ्या भविष्याचा नक्कीच लाभ होईल.*
  *सौख्याच्या दिवसातील चमकधमकीने जे फसले गेले नाहीत, ते अंधःकाराच्या कालखंडाला सहजी सामोरे जाऊ शकतील.*
  *विनम्र सुखाची उभी आणि त्रासाचे दिवस असलेली आडवी वीण नाही, असे आयुष्य कुणाच्याही वाट्याला कदापि येत नाही.*
  *म्हणून कुणीही भरजरी सन्मानाची वस्त्रे घालून ताठ्याने जणु हवेत चालणे, दैवाला मंजूर नाही. जो अशा उद्दामपणे वागतो, तो जन्म- मरणाच्या येरझारा करण्याची जोखीम स्वतःवर ओढवून घेत असतो. विनयशीलता हे एकच वस्त्र अदृश्य देवांच्या समोर सुयोग्य असते. अनेक वर्षांचे सांचलेले तेच तर काढू शकतात.*
  *साऱ्या, साऱ्या गोष्टीचे भाग्य चक्राकार फिरत असते. जे विचार करीत नाहीत, त्यांना या वास्तवाची कदापी जाण नसते. सुर्यमालेत फिरणाऱ्या ग्रहांच्या कक्षेत सुद्धा कधी सुर्यनारायणाचे अगदी जवळ, तर कधी अती दूर असे कालखंड येत असतातच. तद्वत जीवनात आणि माणसाच्या भाग्यांत, सुबत्तेचा महापूर आल्यावर पुढे कंगाल उपासमारीची ओहोटी येऊ शकते. शरीर प्रकृती ही चंचल पाहुण्यासारखी असते. प्रेमाची वस्ती मध्येच पुन्हा येण्याचे निरोप देत अचानक उठून जाते. पण एक गोष्ट निश्चित की, दीर्घकालीन बोचऱ्या दुःखाची क्लेशदायक रात्र संपते, तेंव्हां, नव्या उमलत्या जाणीवेला घेऊन उषःकालाचा मंद प्रकाश क्षितीजावर सुखावू लागतो.*

*या सगळ्या गोष्टींपासून धडा घ्यायचा तो हाच की, वर्तमानात जरी दुःखात विरंगुळा शोधणे कठीण जात असेल आणि निराशा पदरी पडत असेल किंवा पदोपदी क्लेशांचा ससेमिरा लागला असेल तरी, या साऱ्यांचे परिवर्तन, एक दिवस कधीच सुगावा न लागलेल्या आणि कधीच लाभ न झालेल्या शाश्वत निवासात होणार हे अगदी निश्चित !*

*जगांत कुणीही माणूस इतका सुदैवी कदापी नसतो की, ज्याला या दोन्ही गोष्टींची शिकवणी घेणारा पासून सुटका मिळण्याची देवाकडून अनुमती मिळेल.*

- *जोवर उदात्ततेचे दिव्य पंख आपल्याला झांकीत नाहीत, तोवर माणसाला सुरक्षित वाटणे शक्यच नाही. नवदृष्टीचा प्रकाश जोवर अनुभूत होत नाही तोवर, त्याचे सारे कोणतेही उत्तम शोध त्याच्या मार्गातले खराब अडथळेच ठरतील. जेवढा माणूस भौतिकतेत अडकत जाईल, तेवढ्या त्याच्या भोवती बंधनाच्या गांठी वाढतच जातील. माणूस भूतकाळाच्या गुंत्यात असा अडकला आहे की, तो गुंता सुटणे शक्य नाही. अंतरीच्या दैवी अस्तित्वाशी तो निगडीत राहिला तर तो सदैव न डगमगता निर्भय राहील. हे वास्तव त्याने नीट जाणून आपल्या साऱ्या काळज्या, चिंता, प्रश्न दैवी अस्तित्वावर सोपवाव्या म्हणजे त्याला नेहमी सुयोग्य मार्ग दिसत राहील. असे केले तर त्याला उदात्त शांती लाभून निर्भय सन्मान्य मृत्यू येईल.*
- *ज्या भाग्यवंताला आपले खरे दिव्य अस्तिव अनुभूत झाले आहे, त्याला कधीही कुणाचाही द्वेष वाटणार नाही. द्वेषा इतके मोठे पाप कोणतेही नाही.*
  *ज्या जमिनीच्या मालकी हक्कासाठी रक्ताचे शिंतोडे उडाले आहेत, त्याहून दुःखदायक मिळकत दुसरी कोणतीही नाही. अशा मिळकतीच्या लाभाने उलट पिछेहाटच होणार.*
  *आपले काम कुणाच्याही दृष्टी आड झाले आहे, अशा भ्रमांत कधीच राहू नये. सर्वत्र भगवंताची नजर आपल्या प्रत्येक कर्मावर असते.*
- *हे कण्हणारं जग सर्वत्र या न त्या कारणाने शोकात बुडालेलं असतं. खरेतर नीरव सुखद शांती सर्वांसाठी फक्त एक हात अंतरावर असते. दुःखाने गांजलेली  आणि शंकांनी घेरलेली, थकलेली माणसं मोठ्या प्रकाशाचा स्रोत अगदी जवळ असतांनाही, घोर अंधारातून दोन्ही हातांनी चांचपडत जीवनाचा मार्ग कसाबसा क्रमित असतात.*
  *या जगातून द्वेषाची भावना कायमची नष्ट व्हायला, माणसाने आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्तीतील  सामान्य प्रकाशात दिसणाऱ्या चेहऱ्यापलीकडे असणाऱ्या सुप्त दैवी शक्ती पहायला शिकले पाहिजे. एकाच दैवी अस्तित्वाचे विविध रूपातील प्रगटीकरण अशी सर्वांबद्दलची ओळख झाल्यावर द्वेषाची जागा आदर घेईल. सारे देवाच्या एकाच परिवारातील सदस्य असल्याची भावना हृदयात पक्की होऊन, आपुलकीच्या प्रेमरज्जूंनी आपण बांधले जाऊ.*
- *निसर्गाच्या विविध कलाकृतीतील भव्यता आणि बहारदार सौंदर्य माणसाला स्वतःशीच संवाद साधायला लावते. धर्मगुरुची आपल्या लोकांना शिकविण्याची मर्यादा जेथे संपली, तेथून पुढचे विसरलेले संदेश, अंतरी तेजाळलेले कलाकार जगाला देत असतात आणि आत्म्याच्या सुचना मिळवून त्याही व्यक्त करीत असतात.*
  *ज्यावेळी जग थकवा आणतं. त्यावेळी अनंतातील सौंदर्य दर्शनाने डोलायला लावणाऱ्या जाग्या झालेल्या विरळ रम्य स्मृती अंतरीच्या पवित्रतेला शोधून, त्याला उर्वरीत जीवन यात्रेसाठी उत्तेजित होण्याची टांच मारतात.*
  *थोडीशी शांती, जरासे बळ आणि प्रकाशाची अल्पशी तिरीप यांच्या शोधात असणाऱ्यांना जेंव्हा स्वतःच्या खऱ्या अस्तित्वाच्या अनुभूतीचा स्पर्श होतो तेंव्हा, त्याला अमाप शक्ती आणि सुयोग्य*

*नुकसान भरपाईचा लाभ होतो.*
*तत्वज्ञानाच्या भाराभर पुस्तकात डोके खुपसून किंवा प्राचीन हस्तलिखितांच्या प्रती वाचून सुद्धा यापेक्षा जास्त कांहीच हाती लागणार नाही. एकच सत्य. ते म्हणजे, आपले वास्तविक आत्मस्वरूप हेच सर्वोच्च परब्रह्म आहे !*
*पूर्तता होऊ न शकलेल्या आकांक्षा कालप्रवाहात क्षीण होत जातात. पण चिरंजीव अस्तित्वाचा लाभ, खरे प्रेम, आणि परमानंदाची निश्चिती यांची पूर्तता खात्रीने होईल. कारण भविष्यातील घटनांची सूचना देणाऱ्या अंतःप्रेरणा याच तर अटळ नशीब घडवितात.*

*पूर्वीच्या संत महात्म्यांनी आणि धर्म मार्गदर्शकांनी सांगितलेले गहन विचार लक्षात घेऊन जग मलीन कालखंडात अशा प्रभावी नीतीशास्त्राच्या अनुसरणाला कचरते. परंतु जेंव्हा माणसाला आपल्या तेजस्वी अस्तित्वाची ओळख पटते, तेंव्हा, तो पूर्णतया तृप्त होतो. विचार आणि इच्छांच्या पोटी दडलेल्या गोष्टीत होणाऱ्या लाभाची न झालेली पूर्तता त्याच्या पायदळी येते. शांत सुस्थिर मनाच्या एकांतवासांत उद्भवणारी दिव्य दर्शने हिब्रू आणि अरब द्रष्ट्यांच्या पेक्षा कमी पावन नसतात. या साऱ्या शोधाचा उद्देश एकमेव दैवी मूलस्थान प्राप्तीसाठीच असतो. अशाच अंतरीच्या दिव्य उषःकाली बुद्धाला प्रकाश जाणवला आणि मानव मात्रांसाठी निर्वाण गवसले. सर्वांच्या ठायी प्रेमाचा वर्षाव करणारे हे ज्ञान मनी जागृत व्हावे म्हणून तर येशूचे शिष्य त्याच्या पायाशी करुणा भाकीत होते.*

*जीवनाच्या भौतिक शर्यतीत, काळाच्या ओघात सुस्त वाटत असणाऱ्या या सर्व प्राचीन शाश्वत सत्यांची भव्यता आणि निर्मलता कदापीही कमी होणार नाही. सर्व काळात या गूढ जीवनमूल्यांची आठवण मानवाला मुक्तपणे करविली गेली आहे.*
*यांचे नुसते बौद्धिक स्तरावर ज्ञान होऊन उपयोग नाही आणि त्यांच्याबद्दल नुसते गौरवोद्गार काढण्यात धन्यता मानण्यातही अर्थ नाही, तर, हृदयापासून त्यांच्या आविष्कारांचे अवतरण जीवनात पदोपदी होणे आणि दैवी अस्तित्वाची आपल्यात समरसता होणे आवश्यक आहे. आपल्या विचारांतून त्यांचे तेजस्वी व्यक्तीकरण एकाद्या ताऱ्या भोवती फिरणाऱ्या लघु ग्रहासारखे नित्य व्हायला हवे.*

*

मी ऐहिकाच्या वर्तुळात कुणा अज्ञात शक्तीच्या जोराने परतलो. माझ्या भोवतालच्या परिसराची मला जाण आली. मी महर्षींच्या हॉलमध्ये होतो. घड्याळ मला जेवणासाठी जायला सांगत होते. एकदम माझ्या डावीकडे कुणी असल्याची जाणीव झाली. ते ७५ वर्षाचे निवृत्त स्टेशन मास्तर होते. त्यांचे माझ्याकडे एकटक लक्ष होते.
तुम्ही ध्यानावस्थेत जवळजवळ दोन तास आहात, त्यांनी सांगितले. त्यांनी हंसून माझ्या आनंदाला सहभाग दिला.
मी कांही बोलू इच्छित होतो. पण शब्द उमटेना. माझी वाचा शक्तीच जणु गेली, असे वाटले. जवळजवळ पंधरा मिनिटांनी ती परत आली.
महर्षी सारा वेळ अगदी जवळून तुमच्यावर लक्ष ठेऊन होते. तुमच्या विचारांना तेच दिशा दाखवित होते. स्टेशन मास्तर म्हणाले.

महर्षी हॉलमध्ये परतले. त्यांच्या पाठोपाठ आलेल्यांनी आपापल्या जागा घेतल्या. आता झोपण्याआधीचे हे लघु सत्र होते. महर्षी आसनात बसले त्यांनी माझ्या दृष्टीला दृष्टी भिडविली. जेंव्हा महर्षींच्या जवळच्या दिव्याची वात कमी करण्यात आली, मला महर्षींच्या तेजस्वी शांत डोळ्यातील दैवी चमक विशेषत्वाने जाणवली. जणु दोन झगमगते दिवे तेजाने चमकत होते. सुरेख दरवळत असलेल्या सुगंधी वातावरणांत चाळीस मिनिटे अशीच शांत गेली. मी काही बोललो नाही. तेही मौनात होते. शब्दांचा तेथे उपयोगच नव्हता. आमची उभयतांची ओळख शब्दाविनाच पूर्णत्वाने झाली होती.

*

दोन दिवस झाले ताप त्रास देत होता. ते वृद्ध निवृत्त स्टेशन मास्तर दुपारी खोलीवर आले. मला म्हणाले, आता आपल्या निरोपाची वेळ जवळ आली आहे. परंतु तुमचे परत येणे निश्चित आहे. मीही दुजोरा दिला.

ते गेल्यावर मी बाहेर आलो. अरुणाचल पर्वताचा पावन आरक्त वर्णी परिसर डोळ्यांना सुखावत होता. संध्याकाळ झाली मी महर्षी सोडून सर्वांचा निरोप घेतला. अध्यात्माची निशंक प्राप्ती झाली असल्याने मन समाधानाने तुडुंबले होते. महर्षींच्या पावन आत्म्याने मला घट्ट मिठीत घेतलेले होते. ती मिठी कदापी न सुटणारी होती.

तारकांनी चमचमत्या आकाशात, आभाळात चंद्र चमकू लागला. शीतल चांदणे धरतीवर पसरले होते. मी महर्षींच्याकडे पाहून निघालो. माझे हात उंचावले. महर्षींनी माझेकडे पाहून स्मित हास्य केले. उजवा हात किंचित उंचावत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

उंच ताम्रवर्णी महर्षींची तेजस्वी डोळ्यांची दैवी नजर माझ्या सदैव पाठीशी आहे. याची पूर्ण निश्चिती होती.

बैलगाडीत बसलो गाडीवानाने आवाज करून गाडी हांकली. नीरव शांतीचा भंग करीत गाडी मार्ग क्रमू लागली.





लेखन पूर्ण - बोधी पौर्णिमा २०१५. ०४/०५/१५.